# पुणे महानगरपालिका

## <u>करआकारणी व करसंकलन कार्यालय</u>

## <u>कामकाज कार्यपद्धती</u>

# अनुक्रमणिका


| अ.क्रं. | विषय | पान क्रं. |
|---|---|---|
| १. | मनोगत | |
| २. | मिळकतींच्या कर आकारणी व कर संकलनाबाबत माहिती | |
| ३. | निवासी, बिगरनिवासी व मोकळ्या जागा यामधील विविध प्रकारांनुसार निश्चित करण्यात येणाऱ्या करपात्र रकमेबाबतची उदाहरणादाखल माहिती | |
| ४. | वार्षिक करपात्र रकमेवर सन २०१६-२०१७ वर्षाकरिता आकारावयाच्या दराची माहिती | |
| | **कामकाज कार्यपद्धती (प्रोसेस मॅन्युअल)** | |
| ५. | स्वयंमिळकतकर आकारणी अर्ज (फॉर्म नं. पीटी - १) | |
| ६. | मिळकतकर थकबाकी नाहरकत प्रमाणपत्र (फॉर्म नं. पीटी २) | |
| ७. | निवासी मिळकतीचा वापर मालक स्वत:च्या राहण्यासाठी करित असल्यास अंदाजे वाजवी भाड्यामध्ये ४०% सवलत देणेबाबत. (फॉर्म नं. पीटी ३) | |
| ८. | भाडेकरू वापरात बदल झाल्याने वार्षिक करपात्र मूल्य निश्चितीचा अर्ज. (फॉर्म नं. पीटी ४) | |
| ९. | मिळकतकर नाव हस्तांतरण अर्ज. (फॉर्म नं. पीटी ५) | |
| १०. | मिळकतकर थकबाकी दुरूस्तीबाबत. (फॉर्म नं. पीटी ६) | |
| ११. | दुबार/विकसित/पाडलेली मिळकत शून्य करणेबाबत. (फॉर्म नं. पीटी ७) | |
| १२. | मिळकतीच्या क्षेत्रफळातील दुरूस्ती. (फॉर्म नं. पीटी ८) | |
| १३. | मिळकतकरातील पाणीपट्टी निवासी व बिगरनिवासी मीटरप्रमाणे नोंद घेणेबाबत. (फॉर्म नं. पीटी ९) | |
| १४. | मिळकतीच्या आकारणी/ठरावबंद उतारा मिळणेबाबत. (फॉर्म नं. पीटी १०) | |
| १५. | मिळकतीवरील नावात व घरांकामध्ये दुरूस्ती. (साध्या पेपरवर अर्ज) | |
| १६. | बिगरनिवासी जागा रिकामी असल्याबाबत द्यावयाची नोटीस. (साध्या पेपरवर अर्ज) | |
| १७. | कोर्ट ऑर्डरनुसार करपात्र रक्कम निश्चित करून रकमेचे रिफंड करणे. (साध्या पेपरवर अर्ज) | |
| १८. | २० डिसेंबर ते १५ जानेवारी या मुदतीतील जाहीर प्रकटनानुसार अर्जाची पूर्तता. (साध्या पेपरवर अर्ज) | |
| १९. | गांडूळखत प्रकल्प,रेनवॉटर हार्वेस्टींग,सोलरसीस्टीम राबविल्याबाबत देण्यात येणारी सवलत.(साध्या पेपरवर अर्ज) | |
| २०. | स्वातंत्र्य सैनिकास देण्यात येणाऱ्या सवलतीबाबत.( साध्या पेपरवर अर्ज) | |
| | **कर आकारणी व कर संकलन विभागाकडील विविध धोरणांबाबत थोडक्यात माहिती** | |
| २१. | मिळकतकरांतर्गत केलेल्या विविध योजनांबाबत माहिती, मोबाईल टॉवर्सच्या कर आकारणीबाबत माहिती. | |
| २२. | मिळकतकर आकारणीबाबत घेण्यात आलेले धोरणात्मक निर्णय | |
| २३. | मिळकतकर वसूलीबाबत कार्यपद्धती. (विविध फॉर्मचे नमुने) | |
| २४. | मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील कर आकारणी व कर संकलनाबाबत कलम व नियमांची माहिती | |

## १) मनोगत

पुणे महानगरपालिकेच्या सेवेमध्ये मी दि. २५/०८/२०१४ रोजी सेवेस प्रारंभ केला. यापुर्वी तहसिलदार, प्रांत अधिकारी, उपजिल्हाधिकारी या पदावर शासनाच्या सेवेत कामाची पुर्तता केली आहे.

कर आकारणी व कर संकलन विभागाकडील विविध कामाचे प्रकार, कामाची व्याप्ती इत्यादी बाबी विचारात घेऊन नवीन आलेल्या सेवकांना कर आकारणी व कर संकलनासंदर्भातील विविध कार्यालय परिपत्रके, धोरणे, कार्यपद्धती इत्यादींबाबी संदर्भात माहिती होणे आवश्यक आहे. यासंदर्भात कर आकारणी व कर संकलन विभागाकडे अशी माहिती विविध ठिकाणी ठेवल्याचे निदर्शनास आले.

कर आकारणी व कर संकलन विभागाकडील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये मागील आर्थिक वर्षापेक्षा सुमारे ११० कोटी रूपयाने अधिक उत्पन्न जमा केले. तसेच अनधिकृत बांधकामे, प्रलंबित असलेली भोगवटापत्रे, वाढीव बांधकामांची तपासणी इत्यार्दी संदर्भात वेळोवेळी बैठका व आढावा घेऊन सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये सुमारे १०० कोटी पेक्षा अधिक नव्याने वार्षिक करपात्र रक्कम निश्चित केली.

मा.महापालिका आयुक्त यांनी मिळकतकरापोटी रू.१०३७.३९ कोटी व मुख्यसभेने १२०४.३९कोटी इतके उदिदष्ट दिले असून सुमारे ११८३.८९ कोटी वसुली करण्यात आली आहे. मा. महापालिका आयुक्त यांचे उद्दिष्टांशी तुलना करता सुमारे ११४ % व मा.मुख्यसभेशी तुलना करता सुमारे ९८.२९ %मिळकतकरापोटी वसुली केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षीची जमा वसुली रक्कम सुमारे ४१ %अधिक आहे.
तसेच ऑनलाईन कलेक्शनची रक्कम मागील वर्षीच्या तुलनेत ६६.०४%(१६०.०३कोटी )वाढ झाली आहे. पुणे शहरातील करआकारणी न झालेल्या व वापरात बदल झालेल्या सुमारे २९७५३ मिळकतींची नव्याने करआकारणी करून १६९कोटीनी करपात्र रक्कम व सुमारे १३५ कोटीने नविन मागणी वाढ केली आहे.
पुणे शहरातील ज्या मिळकतींची वार्षिक करपात्र रू. १ ते २५००० इतकी आहे अशा सर्व मिळकतीवरील कराची थकित बाकी वसुल करणेसाठी, एकरकमी संपूर्ण रक्कम (थकबाकीसह) मिळकतदारांनी दिनांक ११.१.२०१६ ते २९.२.२०१६ अखेर कालावधी दरम्यान भरल्यास, भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकुण २% शास्ती रकमेच्या ७५% शास्ती रकमेस माफी देवून शिल्लक रक्कम भरून घेणेबाबत व दिनांक १.३.२०१६ ते ३१.३.२०१६ अखेर कालावधी दरम्यान भरल्यास, भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकुण २% शास्ती रकमेच्या ५०% शास्ती रकमेस माफी देवून शिल्लक रक्कम भरून घेणेबाबत दिनांक ११.१.२०१६ ते ३१.३.२०१६ अखेर अभय योजना राबवून या कालावधीत एकूण सुमारे १,४५,६७५ इतक्या थकबाकीदारांकडून मिळकतकर थकबाकी रू.३८७.४९ कोटी इतकी वसुली केली.

मिळकतकराची थकीत बाकी वसुली करीता मिळकतदारांना नोटीसा पाठविणे, एसएमएस पाठविणे, घरासमोर बँड वाजविणे इ. कारवाई करून थकीत बाकी वसुली केली. मिळकतकराची बिले न मिळण्याचे तक्रारी विचारात घेवून सन २०१५ २०१६ मधील सुमारे ७,९५,००० मिळकत बिले प्रथमच पोस्ट खात्यामार्फत प्रभावीपणे वाटप केले. त्याच बरोबर अपूरा पत्ता असल्याने बिल मिळत नाही यासाठी पत्ता शोधून त्याची नोंद डेटाबेसमध्ये करणेबाबत कार्यवाही केली.
सन २०१५-२०१६ मध्ये सुमारे ४, ७७,३५३ मोबाईल नंबर्स व २,३६,४३० ई मेल्स संगणकीय डेटाबेस मध्ये संकलित करून त्याव्दारे मिळकतदाराशी संपर्क साधून कराचा भरणा करून घेतला. नव्याने कर आकारणी केलेल्या सर्व मिळकतधारकांचे मोबाईल नंबर व ई -मेल संगणकीय डेटाबेस मध्ये नोंद करण्यात आली.
आकारणीच्या नोटीसा व बिल्स ई-मेल व्दारे व एस.एम.एस. व्दारे पाठविण्यात आली.,मिळकत कर आकारणीचा ए फॉर्म स्कॅन करून तो डेटाबेसशी लिंकींग करून नागरिकांना व कर्मचाऱ्यांना माहिती होणेसाठी कार्यवाही सुरू करणेत आली. महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा २०१५ नुसार संपुर्ण महाराष्ट्रात प्रथमच पुणे मनपाने ऑनलाईन एन.ओ.सी. (ना देय प्रमाणपत्र ) ही सुविधा नागरिकांना प्रथमच उपलब्ध करून दिली. माहे मार्च अखेर सुमारे ४९७७ एन.ओ.सी. दिल्या व मिळकत कर आकारणीचा उतारा व मिळकतीच्या नावात बदल करणेबाबत ऑनलाईन कार्यवाही सुरू करणेत आलेली आहे. नागरिकांचे ऑनलाईन आलेल्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले.

नागरिकांच्या व प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी मिळकतकर विभागाचे कर्मचारी यांची बैठकव्यवस्थेचे विकेंद्रीकरण केले. जीआयएस बेस प्रापर्टी टॅक्स असेसमेंट अँड रिकव्हरी सिस्टीम स्थापित करणेची कार्यवाही सुरू केली.न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांतील अडकलेला महसूल प्राप्त करणेसाठी कलम ४०८ नुसार ‘ ट्रीब्यूनल ’ च्या स्थापनेची कार्यवाही सुरू केली.

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील विविध ठिकाणी असलेली धोरणात्मक माहिती एकत्र करून त्याची कार्यपुस्तिका तयार करण्याबाबत माझे सहकारी श्री. दयानंद सोनकांबळे , प्रशासन अधिकारी यांना मी सूचना केली. प्रशासकीय कामाची संपूर्ण जबाबदारी सांभाळून श्री. दयानंद सोनकांबळे प्रशासन अधिकारी यांनी करआकारणी व करसंकलन विभागाकडील प्रत्येक कामाबाबत कार्यपध्दती तयार करुन नागरीकापर्यंत पोहोचविण्याचे काम उल्लेखनिय आहे.

मा. महापालिका आयुक्त श्री.कुणाल कुमार साहेब, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) श्री. राजेंद्र जगताप , अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) श्री. ओमप्रकाश बकोरीया ,श्रीमती देशभ्रतार मॅडम व उप आयुक्त सामान्य प्रशासन श्री. मंगेश जोशी व पुणे महानगरपालिकेमधील सर्व उप आयुक्त तसेच तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शन व साथ मिळाली. त्याचप्रमाणे सहा महिने मुदतीसाठी एकवट वेतनावर नेमणूक केलेले सि.डेटाबेस इंजिनिअर श्री. चेतन बोरसे व त्यांची टीम यांचेही सहकार्य लाभले त्यामुळे मी पुणे महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन या महत्वाच्या व महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या कार्यालयाकडील कार्यभार सांभाळून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठीचे कामाची संधी मिळाली. त्याबद्दल ऋणी आहे.
धन्यवाद !

**(सुहास मापारी)**
**उप आयुक्त तथा**
**कर आकारणी व कर संकलन प्रमुख**
**पुणे महानगरपालिका.**

## २) करआकारणी व करसंकलनाबाबत प्रस्तावना

पुणे महानगरपालिकेचे कायमस्वरुपी मिळकतकराच्या रुपाने उत्पन्न मिळवून देणारे करआकारणी व कसंकलन हा विभाग आर्थिकदृष्ट्या महत्वाचे स्त्रोत आहे. यासाठी मिळकतींची करआकारणी व केलेल्या करआकारणीनुसार मिळकतकराची वसुली करणे हे पुणे शहराच्या विकासासाठी महत्वाचा भाग आहे. याकरीता नागरीकांनी केलेल्या अर्जानुसार, शहर अभियंता बांधकाम विभाग यांचेकडून देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी व त्यानुसार दिलेले भोगवटा पत्र यानुसार तसेच प्रशासनाकडील अधिकारी , कर्मचारी यांचेकडून मिळकतीची तपासणी करुन त्यानुसार शहरातील सर्व मिळकतींची करआकारणी करुन त्यांना मिळकतकराची देयके पाठविणे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे कामकाज आहे.

वरीलप्रमाणे मिळकतींची करआकारणी करणे व मिळकतकराची वसुली करणे हे काम करीत असतांना नागरीकांनी त्यांना मिळणाऱ्या विविध सेवासुविधांकरीता त्यांनी केलेल्या अर्जानुसार त्यांचे मिळकतकर आकारणी व संकलनाबाबत ठरवून दिलेल्या कालावधीत कामाची पुर्तता करणे हेही अत्यंत महत्वाचे कर्तव्य आहे. त्यामुळे मिळकतकराच्या रुपाने जमा होणारे उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी, शासननिर्णय, मा.मुख्यसभा यांनी दिलेली मान्यता ,मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेचे विविध धोरणे, इ. नुसार करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील कामकाजाबाबत कार्यवाही करण्यात येते. यासंदर्भात सविस्तर माहिती पुढे दर्शविण्यात आलेली आहे.

## ३) करआकारणी व करसंकलन कार्यालयाची मिळकतकर विषयक संगणकीय कामकाज

### पुणे महानगरपालिकेची वेबसाइट






### ४) मिळकतकराबाबत नागरीकांना व कर्मचाऱ्यांना माहिती घेणेसाठी उपलब्ध करुन दिलेली यंत्रणा.




पुणे महानगरपालिकेच्या करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील करआकारणी झालेल्या सर्व मिळकतीचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. मिळकत कराचा संपूर्ण डेटाबेस ओरॅकल या प्रोग्राममध्ये आहे.

मिळकतकर विभागाचे संगणकीकरण करणे व ते अद्ययावत करणेबाबत यापुर्वी बाहेरील संस्थेमार्फत निविदाव्दारे त्यांचेकडून कुशल मनुष्यबळ पुरविणे संदर्भात नेमणूका करुन संगणकीय कामाची पुर्तता येत होती. आता मागील २ वर्षापासून पुणे मनपाने ६ महिन्याच्या कालावधीसाठी करारावर सॉफ्टवेअर इंजिनिअरच्या एकवट वेतनावर नेमणूका करुन संगणक विषयक कामकाजाची पुर्तता करण्यात येत आहे.

पुणे शहरातील ज्या मिळकतींची कर आकारणी झालेली नाही त्यांना मिळकतीची कर आकारणी ऑनलाईन पद्धतीने करणेबाबत ऑनलाईन सेल्फ असेसमेंट प्रोग्रॅम *www.punecorporation.org* , *www. pmc.gov.in*, propertytax.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील व्यतिरिक्त मिळकतकराचा भरणा सर्व एटीएम केंद्र (आय.सी.आय.सी.आय. बँक) सर्व कॉसमॉस, एचडीएफसी बँक, बँक शाखे मार्फत स्विकारण्यात येतो. तसेच ऑन लाईन पेमेंट सुविधा एच.डी.एफ.सी.(बीलडेस्क) बँकेमार्फत www.punecorporation.org propertytax.punecorporation.org या मनपाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिली आहे. व सर्व किऑक्स मशिन्सवर भरणा करणेत येतो.

१) मनपा वेबसाईट www.punecorporation.org, propertytax.punecorporation.org वर मिळकतीचे माहिती शोधणे,मिळकतकराची बाकी, भरलेली रक्कम इत्यादी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.

२) मनपा वेबसाईट www.punecorporation.org वर मिळकतीच्या कर आकारणी संदर्भात मिळकतकर वाजवी भाडे दरसूची सन २००७–०८ उपलब्ध करून दिली आहे. या पुस्तिकेमध्ये पुणे मनपाच्या हद्दीतील मिळकतींची ५३ विभाग व ६०० भाग याप्रमाणे विभागणी केली असून त्यामध्ये कर आकारणीसाठी निवासी, बिगरनिवासी, कार्यालय, मोकळ्या जागा इत्यादींसंदर्भात वाजवी भाड्याचा दर उपलब्ध करून दिलेला आहे तसेच मिळकतीच्या विविध प्रकारच्या कर आकारणीबाबत उदाहरणादाखल

माहिती उपलब्ध करून दिली आहे. सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासून वाजवी भाड्याच्या दरामध्ये वाढ झालेली असल्याने त्याप्रमाणे सुधारीत दर अद्ययावत करण्याची कार्यवाही चालू असून ती पूर्ण झाल्यानंतर वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

३) दि. ०१/०४/२०१२ पासून मिळकतदारांना त्यांच्या मिळकतीची ऑनलाईन कर आकारणी करून घेणेबाबत सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही चालू आहे.

४) मोबाईल एसएमएसद्वारा मिळकतकर बाबत माहिती दिली जाते.

५) मिळकतकराची रक्कम ऑनलाईन कशा पध्दतीने भरावयाची याबाबतचे टप्पे सोबत जोडले असून ते नागरिकांना माहितीसाठी दिलेले आहेत. मिळकतीच्या वापरातील बदल, वाढीव बांधकाम,नविन मिळकत इ. करआकारणीबाबत ऑनलाईन करआकारणी कशा पध्दतीने करता येईल याबाबत माहिती दिली आहे.

६) दि.१/४/२०१३ पासून हस्तलिखित करआकारणीचे अे फॉर्म न करता संगणकाव्दारे अे फॉर्म करण्यात येत असल्याने त्यामुळे आकडयाच्या कॅलक्यूलेशनमध्ये चुका होत नाहीत व अचूक अे तयार करणयात येत असून हस्त लिखीत मुळे वेळेत बचतही होत आहे.

मिळकतकराचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आलेले असून विविध प्रकारचे सर्व रिपार्टस त्वरेने उपलब्ध होतात.

कार्यालयीन कामकाजासाठी व नागरीकांच्या सोयीसाठी संगणक विषयक खालीलप्रमाणे माहिती ऑनलाइन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये सुमारे ४, ७७,३५३ मोबाईल नंबर्स व २,३६,४३० ई मेल्स संगणकीय डेटाबेस मध्ये संकलित करून त्याव्दारे मिळकतदाराशी संपर्क साधून कराचा भरणा करून घेतला.

माहिती अधिकार कायदे अंतर्गत कलम ४बी अन्वये पुणे महानगरपालिकेच्या वेबसाइटवर अ.क्र.३० मध्ये करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे नागरीकांचा जाहिरनामा, प्रोसेस मॅन्युअल इ. संदर्भातही माहिती पुणे मनपाच्या वेबसाइटवर उपलब्ध करुन दिलेली आहे.

**अधिक संपर्कासाठी**

**उप आयुक्त तथा कर आकारणी व कर संकलन प्रमुख दूरध्वनी क्र. ०२० – २५५०११५१.**
**प्रशासन अधिकारी – ०२० – २५५०११५४, ११६२, ११६५, ११५७**
**संगणक विभाग –०२०–२५५०११६०/११६४**
**तक्रार निवारण केंद्र ०२०–२५५०११५९**

## ५.करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडे अधिकारी व सेवकाबाबत माहिती खालीलप्रमाणे

### माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ४ (१) ख–१ नुसार

उप आयक्त तथा करआकारणी व करसंकलन प्रमरव

,श्री.दयानंद सोनकांबळे
प्रशासन अधिकारी .
करआकारणी व करसंकलन

श्री.वैभव कडलख
प्रशासन अधिकारी .
करआकारणी व करसंकलन

प्रशासन अधिकारी .
करआकारणी व करसंकलन
रिक्त जागा

श्री.चेतन कबाडे
प्रशासन अधिकारी .
करआकारणी व करसंकलन

कर अधिक्षक ४ रिक्त४

उप अधिक्षक १

उप अधिक्षक १

स्टेनो टायपिस्ट १

वरिष्ठ लिपिक
१९ रिक्त २

कनिष्ठ लिपिक
११४ रिक्त १७

शिपाई / ड्रायव्हर
१८ रिक्त २

फिटर ४ रिक्त ४

बिगारी ३

### (i) The particulars of its organization, functions and duties.

**कर आकरणी व कर संकलन कार्यालय,**
पुणे महानगरपालिका भवन, तळ मजला, पुणे ५
दूरध्वनी क्र. २५५०११५१/११५४/११६२/११६५/११५३/११५७/११६४

**<u>सेवकवर्ग</u>**

| पदाचे नाव | एकूण शेड्यूल मान्य जागा | रिक्त जागा |
|---|---|---|
| कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ | – |
| सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख | ४ | १ |
| कर अधिक्षक | ४ | ४ |

| | | |
|---|---|---|
| उप अधिक्षक | १ | ० |
| उप अधिक्षक | २ | ० |
| स्टेनो टायपिस्ट | १ | - |
| सि ग्रेड लेखनिक | १९ | २ |
| ज्यु. ग्रेड लेखनिक | ११४ | १७ |
| शिपाई | १६ | ०२ |
| ड्रायव्हर | २ | ० |
| फिटर | ४ | ४ |
| शिपाई कम मोटार सारथी | १ | १ |
| बिगारी | ३ | ० |
| | १७२ | ३१ |

या व्यतिरिक्त विविध क्षेत्रिय कार्यालय व संपर्क कार्यालयाकडे सि. ग्रेड लेखनिक व शिपाई या हुद्दयावरील सेवक उपलब्ध असून त्यांची संख्या १०० इतकी आहे.

**माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ५ (१) व (२) नुसार जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्याची तरतूद असून** मा.महापालिका आयुक्त कार्यालय परिपत्रक जा.क्र.मआ/झोनीपु/३/१७४४,दि.२५/०२/२०१५, ३/८२४,दि.२८/०८/२०१५ अन्वये करआकारणी व करसंकलन कार्यालयाकडील प्रथम अपिलीय अधिकारी , जनमाहिती अधिकारी व सहा.जनमाहिती अधिकारी यांची माहिती.

| अ.क्र | प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासन अधिकारी करआकारणी व करसंकलन | जनमाहिती अधिकारी तथा विभागीय निरीक्षक/विभाग प्रमुख | सहा.जन माहिती अधिकारी | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री.सुहास मापारी**<br>उप आयुक्त<br>करआकारणी व करसंकलन<br>रुम नं.५ तळमजला<br>कार्यालय फोन<br>नं.११५१,९६८९९३१५०८<br>maparisuhas@gmail.com | श्री.दयानंद सोनकांबळे प्रशासन अधिकारी करआकारणी व करसंकलन रुम नं.२ तळमजला करआकारणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११५४,<br>९९२२९७११५४<br>daya.sonkamble123@gmail.com | श्रीमती गराडे व श्रीमती राजपाठक<br>श्री.अविनाश घोडके<br>श्री.तुकाराम कामथे<br>श्री.विनयकुमार आडेप<br>तळमजला रूम नं.४ समोर | आस्थापना विभाग, पगारपत्रक विभाग<br>अंदाजपत्रक स्टेशनरी आवक जावक |
| २ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.श्रीकांत देशपांडे<br>औंध क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं. ९८५०८७२६७० | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | औंध, बोपाडी, पाषाण, बावधन, बाणेर |
| ३ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.घारे<br>कोथरूड क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं.९८९०७७२३०६ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | कोथरुड भाग २, भुसारी कॉलनी कोथरुड भाग |
| ४ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळ मजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.विलास जगताप<br>फोन नं.९६८९९३७०४७ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | भवानी पेठ, म.फुले पेठ, घोरपडी पेठ, शनिवार पेठ, गणेश पेठ, रविवार पेठ, बुधवार पेठ, रास्ता पेठ, नानापेठ, सोमवार पेठ, मंगळवार पेठ, कसबा पेठ |
| ५ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.केमसे<br>फोन नं.८९८३४६७६०४ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | कोंढवा बु,<br>बिबेवाडी,येवलेवाडी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय फोन नं.११६२,९६८९९३११६२<br>vkadlakh@gmail.com | श्री. रासकर<br>फोन नं. ९८५००६३६७६<br>ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | सिव्हिल लाईन- १ व २ ताडीवालारोड,बंडगार्डन रोड,कोरेगाव पार्क,ढोले पाटीलरोड,घोरपडी,मुंढवा वडगाव शेरी,कल्याणी नगर,लोहगाव. |
| ७ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२,९६८९९३११६२ | श्री.नाना माने<br>फोन नं.९९५०७१३८४५ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | विश्रांतवाडी,संगमवाडी, येरवडा भाग-१ व २, धानोरी, कळस |
| ८ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री. विजय शिंदे<br>वारजे क्षेत्रिय कार्यालय,<br>९९२३०९५२३४ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | कर्वेनगर, वारजे |
| ९ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री. पटेल<br>हडपसर क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं. ९६८९१४८९७३ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | हडपसर, हडपसर (जुनी हद्द) |
| १० | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२ ,९६८९९३११६२ | श्री. सुनिल मते<br>टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय<br>रूम नं.४ फोन नं.११५६, | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | वडगाव खुर्द,वडगाव धायरी,वडगाव बुद्रुक |
| ११ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.आढागळे, सि.ग्रे.लेखनिक<br>तळमजला रूम नं.१८<br>फोन नं.११६८ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | ऑडीट आक्षेप व इतर मालमत्ता विवरण पत्र. |
| १२ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.सुनिल मोरे,<br>श्रीमती.देवळालीकर रूम नं.२१०,दुसरा मजला फोन नं.११६० | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | संगणक विभाग प्रमुख |
| १३ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्रीमती खेडेकर सि.ग्रे.लेखनिक<br>रूम नं -६,१३,१९ तळमजला<br>फोन नं.११६७/११६९ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | आकारणी विभाग |
| १४ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय फोन नं.११६२,९६८९९३११६२ | श्रीमती.राजपाठक<br>उप अधिक्षक तळमजला<br>फोन नं.११७३ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | टीअेटी हस्तांतरण सोलर व गांडूळ खत प्रकल्प |
| १५ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.मखामले, श्री.पाटील<br>तळमजला रूम नं १८<br>फोन नं.११६८ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | जीएमआर,मोबाईल टॉवर |
| १६ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.ठकार तळमजला,<br>रुम नं.१<br>फोन नं.११६५ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | थिएटर टॅक्स |
| १७ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.विलास बधे<br>औंध क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं. ९८२३३७१६३० | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | बाणेर बालेवाडी |
| १८ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.सुभाष बसप्पा कांबळे<br>येरवडा क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं. ९८५०८६४८५३ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | विश्रांतवाडी, लोहगाव, विमाननगर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | धनकवडी भाग १, धनकवडी भाग २ |
| २० | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.आनंद केमसे<br>वानवडी कोंढवा क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं. ८९८३४६७६०४ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | कोंढवाखुर्द, मिठानगर, शेवनेरीनगर, लुल्लानगर |
| २१ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.विजय देसाई<br>धनकवडी क्षे.कार्या.<br>फोन नं. ९७६४१३७३७७ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | आंबेगाव, कात्रज |
| २२ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.शेखर काळे<br>हडपसर क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं.९८९०६९३११९ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | महंमदवाडी, ससाणेनगर, विठ्ठलनगर, सातववाडी |
| २३ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.कमलाकर काटकर<br>घोले रोड क्षेत्रिय कार्यालय<br>फोन नं.९८५०४०२५५७ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | शिवाजीनगर भाग.१, भाग-२, प्रभात रोड, एरंडवणा |
| २४ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.विजय दहिवाळ<br>हिंगणे क्षे.कार्या.<br>फोन नं. ९६८९९३०७२५ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | हिंगणे खुर्द |
| २५ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.बबलादी अमृत<br>विश्रामबागवाडा क्षे.कार्या.<br>फोन नं. ९८२२४७५५४१ | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | बुधवार पेठ, रविवार पेठ, कसबा पेठ |
| २६ | **श्री.कबाडे**<br>रुम नं.१ तळमजला करआकारणी करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६५ | श्री.ढवळे<br>विश्रामबागवाडा क्षे.कार्या. | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | सदाशिव पेठ |
| २७ | **श्री.वैभव कडलख**<br>रूम नं २१तळमजला करआकरणी व करसंकलन कार्यालय<br>फोन नं.११६२, ९६८९९३११६२ | श्री.मिरगे, श्री.जगले<br>सहकारनगर क्षे.कार्या. | संबंधित विभागाचे पेठ निरीक्षक, पेठ लेखनिक, आकारणी व संगणक विभागाचे कनिष्ठ लेखनिक | बिबवेवाडी, सहकारनगर, पर्वती, संगमवाडी |

## १) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कर आकारणी व कर संकलनाबाबत कलम व नियमांची माहिती

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १२७ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनी व इमारतीवर मिळकतकर आकारण्याबाबत तरतूद असून त्याप्रमाणे पुणे शहरातील इमारती व जमिनीवर मिळकतकराची आकारणी करण्यात येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९९ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनी व इमारतीवर मिळकतकर आकारणेबाबतचे विविध कराचे दर प्रत्येक वर्षी २० फेब्रुवारी पूर्वी मा. मुख्यसभेने मान्यता देणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १२९ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील इमारती व जमिनीवर मालमत्ता करामध्ये कोणत्या कराचा समावेश होतो व ते कोणत्या दराने बसविण्याजोगे असतील याची माहिती नमूद केलेली आहे. १२९ अ मध्ये जिल्हा परिषदेच्या क्षेत्राचा शहरात समावेश करण्यात येईल तेव्हा कमी केलेल्या दरात सामान्य कर बसविण्यासाठी तात्पूर्ती तरतूद करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| कलम १३० | पाणीपट्टी कोणत्या जागेवर बसविण्यात आवश्यक आहे याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १३१ | साफसफाई कर कोणत्या जागेवर बसविणे आवश्यक आहे याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १३२ | सर्वसाधारण कर कोणत्या जागेवर बसविणे आवश्यक आहे याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १३३ | सामान्य कराच्या ऐवजी राज्य शासनाने महानगरपालिकेच्या द्यावयाच्या रकमेबाबत व राज्य शासनाच्या इमारतीची कर योग्य मूल्य निश्चित करण्यात संदर्भात विशेष अधिकाऱ्यांच्या नेमणूकीबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १३७ | विवक्षित बाबतीत विशेष आो साफसफाई कर निश्चित करता येईल याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १३९ | मालमत्ता कराची प्राथमिक जबाबदारी कोणावर असावी याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १४० | भोगवटादारांना मालमत्ता कर देण्याबाबत केव्हा जबाबदार धरता येईल याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १४०अ | मालमत्ता कराची रक्कम आगाउ भरण्यातून सूट देण्यात येते. |
| कलम १४०ब | परिस्थितीदृष्टया लाभदायक योजनेची अंमलबजावणी केल्यास मालमत्ता करातून सूट देण्यात येते. |
| कलम १४१ | ज्या जागेवर मालमत्ता कर आकारला असेल त्याजागांवर तो प्रथम भार असणे याबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १४८ | नाट्यगृहावरील कराबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १५०क | सहा वर्षे मागे जावून करआकारणी करता येते. पूर्वी असे करता येत नव्हते |
| कलम १५१ | कराचे परताव्याची मागणी नियमानी विहीत केलेल्या रितीने व शर्तीस अधिन राहून करणेबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम १५२ | स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम वसूल होण्याजोगी नसेल ती निर्लेखित करणेबाबत माहिती नमूद केलेली आहे. |
| कलम २६७ अ | अवैद्य इमारतीवर शास्ती बसविणेबाबत तरतूद करण्यात आली असून दिनांक |

१.११.२००८ पासून मा.महापालिका आयुक्त यांची मान्यता ठराव क्र.६/६८० दि. ०३/११/२००८ अंमलबजावणी सुरू केली आहे. शहरातील जे अवैध बांधकाम वैध ठरेपर्यंत सदरची शास्ती बसविणेत येत आहे.

कलम ४०६ बिलाच्या बाबतीत अपील करणे झाल्यास मुंबई प्रां.मनपा अधिनियम १९४९चे कलम४०६ मधील तरतूदीस पात्र राहून व बिल पोहोचल्यापासून १५ दिवसात न्यायालयात अपील करता येईल.

कलम ४८१ (ज) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१(ज) अन्वये कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा कोणतेही नगरपालिका प्राधिकरण किंवा कोणताही नगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यामध्ये निहीत असलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी किंवा त्यांच्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी जो कायदेविषयक सल्ला आणि सहाय्य मिळवणे त्यास वेळोवेळी आवश्यक किंवा इष्ट वाटेल किंवा जो कायदेविषयक सल्ला आणि सहाय्य त्याने मिळवावे अशी महानगरपालिकेची किंवा स्थायी समितीची इच्छा असेल असा कायदेविषयक सल्ला आणि सहाय्य मिळविणे आणि त्याबद्दल पैसे देणे. (लवादाची नेमणूक करणे)

कलम ४८५ कोणत्याही आकारणीत किंवा कोणत्याही अटकावणीत किंवा केलेल्या जप्तीत किंवा काढलेल्या कोणत्याही नोटिशीत,बीलात,अनुसूचित समन्समध्ये किंवा अन्य दस्तऐवजात कोणताही उपचारदोष,लेखनप्रमाद,वर्जन किंवा अन्य दोष असल्यास ते कोणत्याही वेळी, शक्य असेल तेथवर दुरूस्त करता येतील.

## २) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ परिशिष्ट क्र. ८ मधील नियम

१) नियम १ अन्वये मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकीहक्काच्या सर्व हस्तांतरणासंबंधी आयुक्तास नोटीस देणेबाबत तरतूद आहे.

२) नियम २ अन्वये नोटिशीचा नमुना याबाबत तदतूद आहे.
२-(३) हस्तांतरणाबाबत वेळोवेळी मा. स्थायी समिती विहित करीत अशी फी स्वीकारणे.

३) नियम ३ अन्वये हस्तांतरणाच्या कोणत्याही नोटिशीच्या अभावी मालमत्ता कर देण्याचे दायित्व चालू राहणेबाबत तदतूद आहे.

४) नियम ४ अन्वये आयुक्तास निबंधकाकडून माहिती मागविता येईल याबाबत तदतूद आहे.

५) नियम ५ अन्वये नवीन इमारत उभारणे इत्यादींसंबंधी आयुक्तास नोटीस देणेबाबत तदतूद आहे.

६) नियम ६ अन्वये इमारत पाडून किंवा काढून टाकल्यासंबंधी आयुक्तास नोटीस देणेबाबत तदतूद आहे.

७) नियम ७ अन्वये करयोग्य मूल्य कशाप्रकारे ठरविता येईल याबाबत तदतूद आहे.

८) नियम ८ अन्वये आयुक्तास मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून माहिती किंवा विवरण मागवता येईल आणि आकारणी योग्य जागांत प्रवेश करता येईल व त्याची पाहणी करता येईल याबाबत तदतूद आहे.

९) नियम ९ अन्वये आकारणी पुस्तकात कोणत्या गोष्टी असल्या पाहिजेत याबाबत तदतूर आहे.

१०) नियम १० अन्वये प्रत्येक प्रभागासाठी वेगळे आकारणी पुस्तक तयार करणे आणि आवश्यक असल्यास त्याचे भाग पाडणे याबाबत तरतूद आहे.

११) नियम ११ अन्वये दोन किंवा अधिक व्यक्तींना पृथकपणे भोगवटा करण्यासाठी भाड्याने दिलेली मालमत्ता कशी आहे म्हणून समजणे याबाबत तदतूद आहे.

१२) नियम १२ अन्वये प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्तींचे नाव निश्चित करता येत नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती याबाबत तरतूद आहे.

१३) नियम १३ अन्वये कोणत्याही प्रभागातील मालमत्तेचे मूल्यमापन पूर्ण होईल तेव्हा जाहीर नोटीस देणेबाबत तरतूद आहे.

१४) नियम १४ अन्वये आकारणी पुस्तक पाहण्यासाठी खुले असणे याबाबत तरतूद आहे.

१५) नियम १५ अन्वये मूल्यनिर्धारणाविरूद्ध तक्रारी सादर करण्यासाठी वेळ जाहीर करणेबाबत तरतूद आहे.

१६) नियम १६ अन्वये मूल्यनिर्धारणाविरूद्ध तक्रारी सादर करण्याची वेळ व रीत याबाबत तरतूद आहे.

१७) नियम १७ अन्वये तक्रारी करणारांस त्यांच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी ठरवलेल्या दिवसाची नोटीस देणेबाबत तरतूद आहे.

१८) नियम १८ अन्वये तक्रारींची सुनावणी याबाबत तरतूद आहे.

१९) नियम १९ अन्वये सर्व तक्रारी निकालात काढल्यानंतर प्रभाग आकारणी पुस्तके माणित करणेबाबत तरतूद आहे.

२०) नियम २० अन्वये आयुक्तास सरकारी वर्षांत आकारणी पुस्तकात सुधारणा करता येईल याबाबत तरतूद आहे.

२१) नियम २१ अन्वये प्रत्येक सरकारी वर्षी नवीन आकारणी पुस्तके तयार करण्याची आवश्यकता असणार नाही याबाबत तरतूद आहे.

२२) नियम २२ अन्वये वाहने, नावा अणि जनावरे यावरील कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती याबाबत तरतूद आहे.

२३) नियम २३ अन्वये वाहने, नावा आणि जनावरे यांवरील कराचे पुस्तक ठेवणेबाबत तरतूद आहे.

२४) नियम २४ अन्वये जागांचे मालक आणि कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्ती यांनी विवरण सादर करणेबाबत तरतूद आहे.

२५) नियम २५ अन्वये ज्या वाहनासंबंधी, नावेसंबंधी किंवा जनावरासंबंधी कर देण्याची पात्रता उद्‌भवेल अशा वाहनाचा, नावेचा किंवा जनावराचा मालक होणाऱ्या किंवा त्याचा कब्जा मिळवणाऱ्या व्यक्तीने आयुक्तास द्यावयाच्या नोटीशीबाबत तरतूद आहे.

२६) नियम ३० अन्वये मालमत्ता कर सहा महिन्यांनी आगाऊ देय असणेबाबत तरतूद आहे.

२७) नियम ३१ अन्वये वाहने, नावा आणि जनावरे यावरील कर आगाऊ देय असणेबाबत तरतूद आहे.

२८) नियम ३२ अन्वये वाहने, नावा व जनावरे यांवरील कर देण्यास पात्र असलेल्या वाहनांवर प्रतीके, बिल्ले किंवा तबकड्या लावणेबाबत तरतूद आहे.

२९) नियम ३३ अन्वये मागणी करण्यात आल्यावर जकात देणेबाबत तरतूद आहे.

३०) नियम ३४ अन्वये मागणी करण्यात आल्यावर पथकर देणेबाबत तरतूद आहे.

३१) नियम ३५ अन्वये जकात व पथकर यांची वसुली कशाप्रकारे करता येईल याबाबत तरतूद आहे.

३२) नियम ३६ अन्वये नाट्यगृहावरील कर आगाऊ देय असणेबाबत तरतूद आहे.

३३) नियम ३७ अन्वये लागोपाठच्या प्रयोगांबद्दल नाट्यगृहांवरील कर ठोक रकमेत भरणेबाबत तरतूद आहे.

३४) नियम ३८ अन्वये नाट्यगृहावरील कर भरण्यात कसूर केल्यास ती वसूल करणेबाबत तरतूद आहे.

३५) नियम ३९ अन्वये विवक्षित करांबद्दल बिले सादर करणेबाबत तरतूद आहे.

३६) नियम ४० अन्वये अनेक करांच्या मागण्यांबद्दल एक बिल केव्हा सादर करता येईल याबाबत तरतूद आहे.

३७) नियम ४१ अन्वये उपरोक्तप्रमाणे दिलेले असेल अशा बिलामध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपुर्वी भरावयाची असेल आणि, जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता. त्या शेवटच्या दिनांकापासून प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल..

३८) नियम ४२ अन्वये अटकावणी किंवा जप्तीबाबत तरतूद आहे.

३९) नियम ४३ अन्वये कसूरदारांची मालमत्ता जेथे–जेथे सापडेल तेथे–तेथे अटकावून ठेवता येईल किंवा जप्त करता येईल याबाबत तरतूद आहे.

४०) नियम ४४अन्वये जंगम मालमत्तेच्या बाबतीत अधिपत्राची अंमलबजावणी कशी करावयाची याबाबत तरतूद आहे.

४१) नियम ४५ अन्वये स्थावर मालमत्तेच्या बाबतीत अधिपत्राची अंमलबजावणी कशी करावयाची याबाबत तरतूद आहे.

४२) नियम ४६ अन्वये अटकावून ठेवलेल्या वस्तूची सूची आणि त्यांच्या विक्रीची नोटीस याबाबत तरतूद आहे.

४३) नियम ४७ अन्वये विक्रीबाबत तरतूद आहे.

४४) नियम ४८ अन्वये शहराबाहेर विक्री याबाबत तरतूद आहे.

४५) नियम ४९ अन्वये जकात किंवा पथकर न दिल्यास त्याबाबत विशेष तरतूदींबाबत तरतूद आहे.

४६) नियम ५० अन्वये काढलेली अधिपत्रे इत्यादींबद्दल फीबाबत तरतूद आहे.

४७) नियम ५१ अन्वये वसुलीच्या खर्चाबद्दलची फी माफ करता येईल याबाबत तरतूद आहे.

४८) नियम ५२ अन्वये येणे असलेल्या भाड्यांबद्दल जप्ती याबाबत तरतूद आहे.

४९) नियम ५३ अन्वये शहर सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तींविरूद्ध संक्षिप्त कार्यवाही करता येईल याबाबत तरतूद आहे.

५०) नियम ५४ अन्वये आवश्यक असल्यास थकबाकीबद्दल कसूरदारांच्या विरूद्ध दावा दाखल करता येईल याबाबत तरतूद आहे.

५१) नियम ५५ अन्वये कारबद्दलची बिले बजावण्याबाबत विशेष तरतुदींबाबत तरतूद आहे.

५२) नियम ५६ अन्वये जागा रिकामी राहिल्यामुळे मालमत्ता कारची रक्कम परत देणेबाबत तरतूद आहे.
नियम ५७ अन्वये जागा रिकामी असल्याविषयी आयुक्तास नोटीस दिल्याशिवाय परताव्याची मागणी करता येणार नाही याबाबत तरतूद आहे.

## ३) मिळकतकर आकारणी विषयक माहिती

**पुणे मनपाच्या हद्दीत असलेल्या व ज्यांची करआकारणी करणे आहे अशा मा.शहर अभियंता यांचेकडून आलेले बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्यानुसार , नागरीकांनी केलेल्या अर्जानुसार पेठ निरीक्षक यांनी स्वत: जागेवर तपासणी करुन, मिळकतीच्या वापरात झालेला बदल विचारात घेवून इ. प्रकारे मिळकतींची करआकारणी करणे व त्याची वार्षिक करपात्र रक्कम परिशिष्ठ ८ नियम ७ अन्वये निश्चित करुन आकारणीची नोटीस देणे बंधनकारक आहे. आकारणीच्या नोटीशीला नागरीकाकडून उत्तर देणेबाबत कायद्याने २१ दिवसाची मुदत दिलेली आहे.**

**मिळकतकर आकारणी व मिळकतकर वसुलीसाठी प्रशासकीय कामाची कार्यवाही कायद्यातील तरतुदीनुसार सुयोदयापासून सुर्यास्तापर्यंतच करता येते.**

**मिळकतकर आकारणी करणेसाठी नेमण्यात आलेले पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांनी त्यांच्याकडे नेमूण दिलेल्या एरीया/विभागामध्ये समक्ष जागेवर जावून मिळकतींची / इमारतींची तपासणी करुन मिळकतीचे क्षेत्रफळांचे मोजमाप करुन त्याच्या नोंदी दैनंदिनीमध्ये टिपून घेणे आवश्यक आहे. मिळकतीच्या वापरात बदल झालेला असल्यास त्याबाबतही नोंदी घेणे आवश्यक आहे. बांधकाम पुर्णत्वाच्या दाखल्यानुसार मंजूर झालेली मान्यता व प्रत्यक्ष जागेवर असलेली वस्तुस्थिती ही विचारात घेवून जागेवरील वस्तुस्थितीनुसार / वापरानुसार मिळकतीची करआकारणी करणे आवश्यक आहे.**

**मोकळ्या जमीनीचे करआकारणी करतांना ७/१२ उतारावर देण्यात आलेल्या क्षेत्रानुसार करआकारणी करणे आवश्यक आहे. काही वेळेस मोकळ्या जागेच्या करआकारणीसाठी अर्ज दिलेला असतो परंतु प्रत्यक्षात जागेवर बांधकाम/ शेड असते व त्याचा वापर विविध कारणासाठी केला जात असतो. याकरीता जागेची तपासणी करुन करआकारणी करणे आवश्यक आहे.**

**मिळकतीची करआकारणी केल्यानंतर पुन्हा त्या मिळकतीमध्ये तपासणी केली जात नाही. परंतु पुर्वी केलेल्या करआकारणी ऐवजी मिळकतदाराकडून मिळकतीच्या वापरात बदल केलेला असतो यासाठी मिळकतीच्या केलेल्या करआकारणीबाबत फेरतपासणी करुन वापरातील बदला नुसार करआकारणी करणे आवश्यक आहे.**

**मिळकतीची करआकारणी करतेवेळेस ए फॉर्मवर देण्यात आलेल्या मजकुरामध्ये अचूक माहिती नमूद करणे आवश्यक आहे. विशेष करुन मिळकतदाराचे संपूर्ण नाव, राहण्या पूर्ण पत्ता जवळची खुण/रस्त्याचे नाव इ. लॅडमार्कसह संपुर्ण माहिती ए फॉर्मवर घेणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे मिळकतदारकाचा मोबाईल नं. ईमेल ॲड्रेस घेवून त्याची नोंद घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांच्या मिळकतीच्या मिळकतकराबाबतची संपूर्ण माहिती त्यांना एसएमएसव्दारे व ईमेलव्दारे पाठविणे सोयीचे होणार आहे.**

निवासी, बिगरनिवासी व मोकळ्या जागा यामधील विविध प्रकारांनुसार निश्चित करण्यात येणाऱ्या करपात्र रकमेबाबतची उदाहरणादाखल माहिती खालीलप्रमाणे असून सदरमाहिती मनपाच्या वेबसाईटवर देण्यात आली आहे.

(नारायण पेठ विभाग क्र. १ भाग क्र. १४ मधील वाजवी भाड्याचे दर विचारात घेऊन खालीलप्रमाणे कर आकारणीची पद्धत दर्शविली आहे. पुणे शहरातील विविध विभागांत वाजवी भाड्याचे दर वेगवेगळे आहेत.)

**१** पुणे महानगरपालिका (कर आकारणी व कर संकलन विभाग) अ - १

उदाहरणासाठी विभाग - नारायण पेठ, विभाग क्र. १ भाग क्रमांक १ या मधील वाजवी भाड्याचा दर विचारात घेण्यात आलेला आहे.

| निवासी बांधकाम : | मिळकत कर आकारण्याचे सूत्र | बांधकाम प्रकार | आर.सी.सी. | लोड बेअरिंग | साधे पत्राशेड |
|---|---|---|---|---|---|
| (जागेचा वापर मिळकतदार स्वतः राहण्यासाठी करीत असल्यास)<br>१) आर.सी.सी. बांधकाम<br>२) लोडबेअरिंग<br>३) साधे बांधकाम, पत्राशेड. | चटई क्षेत्र (चौ. फूट) x वाजवी भाड्याचा दर<br>= अंदाजे वाजवी भाडे<br>- (मालक स्वतः राहण्यासाठी जागेचा वापर करीत असल्यास) ४०% सवलत<br>= सवलतीचे भाडे<br>+ कार पार्कींग<br>= एकूण भाडे<br>x १२ महिने<br>= वार्षिक भाडे<br>वजा १५% (देखभाल दुरूस्ती खर्च)<br>= वार्षिक करपात्र रक्कम. | चटई क्षेत्रफळ चौ. फूट | ५०० | ५०० | ५०० |
| | | x वाजवी भाडे दर प्रति चौ. फूट | १.९६ | १.४७ | ०.९८ |
| | | दरमहा वाजवी अंदाजे भाडे | ९८० | ७३५ | ४९० |
| | | वजा ४०% स्व वापर सवलत | ३९२ | २९४ | १९६ |
| | | सवलतीचे भाडे + पार्कींग | ५८८ + २० | ४४१ + २० | २९४ + २० |
| | | निव्वळ भाडे | ६०८ | ४६१ | ३१४ |
| | | x १२ महिने = वार्षिक भाडे | ७२९६ | ५५३२ | ३७६८ |
| | | वजा १५% देखभाल खर्च | १०९४ | ८३० | ५६५ |
| | | वार्षिक करपात्र रक्कम | ६२०२ | ४७०२ | ३२०३ |
| | | समजा र. रु. | ६२०० | ४७०० | ३२०० |
| वार्षिक करपात्र रक्कम निश्चित केल्यावर येणारा कर रक्कम रुपये : | | | ३८२८ | २४३२ | १६५६ |
| + पाणीपट्टी : | | | १५५० | ११०० | ११०० |
| निव्वळ एकूण टॅक्स रक्कम रुपये : | | | ५३७८ | ३५३२ | २७५६ |

**२** पुणे महानगरपालिका (कर आकारणी व कर संकलन विभाग) अ - २

उदाहरणासाठी विभाग - नारायण पेठ, विभाग क्र. १ भाग क्रमांक १ या मधील वाजवी भाड्याचा दर विचारात घेण्यात आलेला आहे.

| निवासी बांधकाम : | मिळकत कर आकारण्याचे सूत्र | बांधकाम प्रकार | आर.सी.सी. | लोड बेअरिंग | साधे पत्राशेड |
|---|---|---|---|---|---|
| (जागेचा वापर भाडेकरी राहण्यासाठी करीत असल्यास)<br>१) आर.सी.सी. बांधकाम<br>२) लोडबेअरिंग<br>३) साधे बांधकाम, पत्राशेड. | चटई क्षेत्र (चौ. फूट) x वाजवी भाड्याचा दर<br>= अंदाजे वाजवी भाडे<br>+ कार पार्कींग<br>= एकूण भाडे<br>x १२ महिने<br>= वार्षिक भाडे<br>वजा१५% (देखभाल दुरूस्ती खर्च)<br>= वार्षिक करपात्र रक्कम. | चटई क्षेत्रफळ चौ. फूट | ५०० | ५०० | ५०० |
| | | x वाजवी भाडे दर प्रति चौ. फूट | १.९६ | १.४७ | ०.९८ |
| | | दरमहा वाजवी अंदाजे भाडे | ९८० | ७३५ | ४९० |
| | | पार्कींग | २० | २० | २० |
| | | निव्वळ भाडे | १००० | ७५५ | ५१० |
| | | x १२ महिने = वार्षिक भाडे | १२००० | ९०६० | ६१२० |
| | | वजा १५% देखभाल खर्च | १८०० | १३५९ | ९१८ |
| | | वार्षिक करपात्र रक्कम | १०२०० | ७७०१ | ५२०२ |
| | | समजा र. रु. | १०२०० | ७७०० | ५२०० |
| वार्षिक करपात्र रक्कम निश्चित केल्यावर येणारा कर रक्कम रुपये : | | | ६२९८ | ४७५५ | ३१५९ |
| + पाणीपट्टी : | | | २५०० | १९२५ | १३०० |
| निव्वळ एकूण टॅक्स रक्कम रुपये : | | | ८७९८ | ६६८० | ४४५९ |

**३** पुणे महानगरपालिका (कर आकारणी व कर संकलन विभाग) अ - ३

उदाहरणासाठी विभाग : नारायण पेठ, विभाग क्र. १ भाग क्रमांक १४ या मधील वाजवी भाड्याचा दर विचारात घेण्यात आलेला आहे.

| बिगरनिवासी बांधकाम | मिळकत कर आकारण्याचे सूत्र | बांधकाम प्रकार | आर.सी.सी. | लोड बेअरिंग | साधे पत्राशेड |
|---|---|---|---|---|---|
| १) आर.सी.सी. बांधकाम<br>२) लोडबेअरिंग<br>३) साधे बांधकाम, पत्राशेड. | चटई क्षेत्र (चौ. फूट)<br>x वाजवी भाड्याचा दर<br>= अंदाजे वाजवी भाडे<br>+ कार पार्कींग<br>= एकूण भाडे<br>x १२ महिने<br>= वार्षिक भाडे<br>वजा १५%<br>(देखभाल दुरूस्ती खर्च)<br>= वार्षिक करपात्र रक्कम. | चटई क्षेत्रफळ चौ. फूट | १०० | १०० | १०० |
| | | x वाजवी भाडे दर प्रति चौ.फूट | ४.०० | ३.०० | २.०० |
| | | दरमहा वाजवी अंदाजे भाडे | ४०० | ३०० | २०० |
| | | + पार्कींग | २० | २० | २० |
| | | निव्वळ भाडे | ४२० | ३२० | २२० |
| | | x १२ महिने = वार्षिक भाडे | ५०४० | ३८४० | २६४० |
| | | वजा १५% देखभाल खर्च | ७५६ | ५७६ | ३९६ |
| | | वार्षिक करपात्र रक्कम | ४२८४ | ३२६४ | २२४४ |
| | | समजा र. रु. | ४३०० | ३२५० | २२५० |
| | | | | | |
| वार्षिक करपात्र रक्कम निश्चित केल्यावर येणारा कर रक्कम रुपये : | | | २५२५ | १६८१ | ११४२ |
| + पाणीपट्टी : | | | ५०० | ५०० | ५०० |
| निव्वळ एकूण टॅक्स रक्कम रुपये : | | | २७२५ | २१८१ | १६४२ |

**४** पुणे महानगरपालिका (कर आकारणी व कर संकलन विभाग) अ - ४

उदाहरणासाठी विभाग : नारायण पेठ, विभाग क्र. १ भाग क्रमांक १४ या मधील वाजवी भाड्याचा दर विचारात घेण्यात आलेला आहे.

| बिगरनिवासी बांधकाम | मिळकत कर आकारण्याचे सूत्र | बांधकाम प्रकार | कार्यालय |
|---|---|---|---|
| कार्यालय | चटई क्षेत्र (चौ. फूट)<br>x वाजवी भाड्याचा दर<br>= अंदाजे वाजवी भाडे<br>+ कार पार्कींग<br>= एकूण भाडे<br>x १२ महिने<br>= वार्षिक भाडे<br>वजा १५%<br>(देखभाल दुरूस्ती खर्च)<br>= वार्षिक करपात्र रक्कम. | चटई क्षेत्रफळ चौ. फूट | १०० |
| | | x वाजवी भाडे दर प्रति चौ.फूट | २.१७ |
| | | दरमहा वाजवी अंदाजे भाडे | २१७ |
| | | + पार्कींग | २० |
| | | निव्वळ भाडे | २८४४ |
| | | x १२ महिने = वार्षिक भाडे | ४२७ |
| | | वजा १५% देखभाल खर्च | २४१७ |
| | | वार्षिक करपात्र रक्कम | २४०० |
| | | समजा र. रु. | |
| | | | |
| वार्षिक करपात्र रक्कम निश्चित केल्यावर येणारा कर रक्कम रुपये : | | | १२१८ |
| + पाणीपट्टी : | | | ५०० |
| निव्वळ एकूण टॅक्स रक्कम रुपये : | | | १७१८ |

वरील करआकारणी विषयक उदाहरणा दाखल माहिती देण्यात आली असून कनिष्ठ लिपिक-पेठ निरीक्षक यांनी मिळकतीचे क्षेत्र, भाग क्र. ऑनलाईन ए फार्मवर अचूकपणे टाकल्यास पुढील आकडेवारी उपलब्ध होते.

पुणे महानगरपालिका कराचे दर सन २०१६-२०१७

(स्थायी समिती ठराव क्र.२२७७ दि.४.२.१६
व मुख्य सभा ठराव क्र.८०९
दि.१६.२.२०१६
ने मान्य) शहरातील सर्व भागातील मिळकतीवरील कर (जमिनी व इमारती) मुं.प्रा.अ. १९४९, कलम १२७ (१) अ अन्वये आकारावयाचे करास मान्यता दिली असून त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

परिशिष्ट -'अ'

**सन २०१६-१७ साठी मा. मुख्य सभा यांनी मान्यता दिलेल्या करांचा तक्ता**

## परिशिष्ट -'अ'

### (१) करमणूक कर (थिएटर टॅक्स) :-

| तपशिल | प्रतीखेळ/प्रयोग यांचे दर | प्रतीखेळ/प्रयोग यांचे दर | |
|---|---|---|---|
| | सन २००८ २००९ मधील मान्य दर | प्रचलित २०१५-१६ | प्रस्तावित २०१६-१७ |
| **(अ) चित्रपट**<br>१) ५०० पर्यंत बैठक व्यवस्था(सिट्स) असणा-या थिएटरला.<br>२) ५०० पेक्षा जास्त बैठक व्यवस्था (सिट्स) असणा-या थिएटरला.<br>३) वातानुकूल थिएटरला व मल्टिफ्लेक्स थिएटर<br>४) मराठी सिनेमास | ४०/-<br>७०/-<br>१००/-<br>करमाफ | ६०/-<br>१००/-<br>२००/-<br>करमाफ | ६०/-<br>१००/-<br>२००/-<br>करमाफ |
| **(ब) नाटक** | ५०/- | १००/- | १००/- |
| **(क) सर्कस /कार्निव्हल/ पेट्स** | ३०/- | ३०/- | ३०/- |
| **(ड) तमाशा** | १०/- | १०/- | १०/- |
| **(इ)** १.संगीत जलसे / शास्त्रीय संगीत उत्सव थिएटर मधील/व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास. | ७०/- | २००/- | २००/- |
| २.संगीत जलसे / शास्त्रीय संगीत उत्सव थिएटर व्यतिरिक्त प्रत्येक प्रयोगास. | ७०/- | २००/- | २००/- |
| **(ई) कुस्त्या** | २०/- | २०/- | २०/- |
| **(फ )** वरील खेरीज इतर प्रयोग (जर वेगवेगळे खेळ नसतील तर प्रत्येक दिवसास.) | ३०/- | ३०/- | ३०/- |

टिप – प्रस्तुत प्रचलीत व प्रस्तावित करण्यात आलेले दर  महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५५ अन्वये आवश्यक असलेली कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लागू होतील.  तथापि दि.०१–०४–२०१६ पासून सन २००८–०९ मधील दराप्रमाणे कार्यवाही चालू राहील.

## परिशिष्ट –'ब'

### (१) मिळकतकर (**Property Tax**) :-

### (अे) सर्वसाधारण कर (**General Tax**) :-

(सदरचा कर मिळकतीच्या वार्षिक करपात्र रकमेवर आकारण्यात येतो.)

| वार्षिक करपात्र रक्कम रुपये | शहर/ग्रामिण विभाग प्रचलित सन २०१५-१६ दर शेकडा | शहर/ग्रामिण विभाग प्रचलित सन २०१६-१७ दर शेकडा |
|---|---|---|
| | | |
| १ ते २,००० | १६.७५% | १६.७५% |
| २,००१ ते ५,००० | २३.७५% | २३.७५% |
| ६. आवश्यक फी व अर्ज भरण्याचे ठिकाण | :– रक्कम रू. २५/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| ७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी | :– अर्ज दिल्यापासून १ ते २ दिवस |
| ८. निर्णय घेणारे अधिकारी | :– |

| स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा कालावधी |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | १ दिवस |
| तिसरा स्तर | बिल विभाग प्रमुख – क्षेत्रिय कार्यालय / संपर्क अधिकारी | |

टीप :– झेरॉक्स प्रती साक्षांकित करणे आवश्यक आहे.

**कामाचे नाव :- निवासी मिळकतीचा वापर मालक स्वत:च्या राहण्यासाठी करित असल्यास अंदाजे वाजवी भाड्यामध्ये ४०% सवलत देणेबाबत. (फॉर्म नं. पीटी ३)**

| | |
|---|---|
| **१. विषय** | :- निवासी मिळकतीचा वापर मालक स्वतःच्या राहण्यासाठी करीत असल्यास अंदाजे वाजवी भाडयामध्ये ४० % सवलत देणेबाबत |
| **२. खात्याचे नाव** | :- कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :- १. मिळकतीचा वापर स्वतः राहण्यासाठी करीत असल्याबाबत सोसायटीचे नाहरकत पत्र<br>२. महाराष्ट्र राज्य वितरण महामंडळ यांचेकडील विद्युत बिलाची प्रत<br>३. आर्थिक वर्षापर्यंत टॅक्स भरलेली नाहरकत प्रमाणपत्र<br>४. रेशनकार्डाची प्रत<br>५. मतदान ओळखपत्र/ पासपोर्ट/वाहनचालक परवाना इत्यादींची प्रत<br>६. पुणे शहरात अन्य ठिकाणी मिळकत असल्यास त्या मिळकतीच्या मिळकतकराच्या बिलाची प्रत |
| **४. अर्जाचा नमुना** | :- करआकारणी विभाग पीटी ३ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :- संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरण्याचे ठिकाण** | :- रक्कम रू. २५/- संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :- अर्ज दिल्यापासून १ महिना ते २ महिने |
| **८. शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | :- १. मा. मुख्य सभा ठ.क्र. ५, दि. ०३/०४/१९७०<br>२. मा. महापालिका आयुक्त यांचे कार्यालय परिपत्रक जा.क्र. मआ/ऊआवि/१२७, दि. ०७/०७/२००७ |
| **९. निर्णय घेणारे अधिकारी** | :- |

| स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा काला |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | २० दिवस |
| तिसरा स्तर | विभागीय निरीक्षक | ५ दिवस |
| चौथा स्तर | सहा. करआकारणी व करसंकलन प्रमुख | ४ दिवस |
| पाचवा स्तर | करआकारणी व करसंकलन प्रमुख | ५ दिवस |
| सहावा स्तर | संगणक विभाग (मिळकतकराचा दाखला तयार करणे) | २ दिवस |
| सातवा स्तर | बिल विभाग प्रमुख-क्षेत्रिय कार्यालय/संपर्क अधिकारी आलेले बिल नोंद करून सेवाकेंद्रामार्फत नागरिकांना पोहोच करणे | ५ दिवस |

टीप :- मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ शेड्यूल चॅप्टर ८ नियम ४ अन्वये मिळकतदारांनी त्यांच्या मिळकतीची माहिती कर आकारणीसाठी पुणे महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक आहे. मिळकतीची कर आकारणी, बांधकाम पूर्णत्वाचा दाखल, वापर सुरू, वापरात बदल इत्यादींमुळे करण्यात येते. (झेरॉक्स प्रती साक्षांकित करणे आवश्यक आहे.)

४)**कामाचे नाव :– भाडेकरू वापरात बदल झाल्याने वार्षिक करपात्र मूल्य निश्चितीचा अर्ज.**
**(फॉर्म नं. पीटी ४)**

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– भाडयाने दिलेल्या बिगरनिवासी इमारती/सदनिका इ.चे करपात्र मूल्य व मोकळया बखळ/ जमिनीचे करपात्र मूल्य ठरविण्यासाठी दर निश्चित करणे. भाडेकरू वापरात बदल झाल्याने वार्षिक करपात्र मूल्य निश्चितीचा अर्ज |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचा वापर स्वतः करीत असल्यास सोसायटीचे नाहरकत पत्र<br>२. महाराष्ट्र राज्य वितरण महामंडळ यांचेकडील विद्युत बिलाची प्रत<br>३. आर्थिक वर्षापर्यंत टॅक्स भरलेली नाहरकत प्रमाणपत्र<br>४. रेशनकार्डाची प्रत<br>५. मतदान ओळखपत्र/ पासपोर्ट/वाहनचालक परवाना इत्यादींची प्रत<br>६. नोंदणीकृत करारनामा/ताबेपावती, डिपॉझिट परत केल्याची पावती |
| **४. अर्जाचा नमुना** | :– करआकारणी विभाग पीटी ४ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** कार्यालय | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रू. २५/–<br>संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून १ महिना ते २ महिने |
| **८. शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | :– १. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. टीजीओ/९६, दि. १०/४/२००३ नुसार<br>२. मा. महापालिका आयुक्त यांचे कार्यालय परिपत्रक जा.क्र. मआ/ऊआवि/१२७, दि. ०७/०७/२००७ |
| **९. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा काला |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | २० दिवस |
| तिसरा स्तर | विभागीय निरीक्षक | ५ दिवस |
| चौथा स्तर | सहा. करआकारणी व करसंकलन प्रमुख | ४ दिवस |
| पाचवा स्तर | करआकारणी व कर संकलन प्रमुख | ५ दिवस |
| सहावा स्तर | संगणक विभाग (मिळकतकराचा दाखला तयार करणे) | २ दिवस |
| सातवा स्तर | बिल विभाग प्रमुख–क्षेत्रिय कार्यालय/संपर्क अधिकारी आलेले बिल नोंद करून सेवाकेंद्रामार्फत नागरिकांना पोहोच करणे | ५ दिवस |

टीप :– मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ शेड्यूल चॅप्टर ८ नियम ४ अन्वये मिळकतदारांनी त्यांच्या मिळकतीची माहिती कर आकारणीसाठी पुणे महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक आहे. मिळकतीची कर आकारणी, बांधकाम पूर्णत्वाचा दाखल, वापर सुरू, वापरात बदल इत्यादींमुळे करण्यात येते. (झेरॉक्स प्रती साक्षांकित करणे आवश्यक आहे.)

५)  <u>कामाचे नाव :– मिळकतकर नाव हस्तांतरण अर्ज. (फॉर्म नं. पीटी ५)</u>

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– मिळकतकराचे बिलावरील नावांत बदल करणेबाबत |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचा वापर स्वतः करीत असल्यास सोसायटीचे नाहरकत पत्र<br>२. खरेदीखत, करारनामा, इंडेक्स २,<br>३. आर्थिक वर्षापर्यंत टॅक्स भरलेली नाहरकत प्रमाणपत्र<br>४. ७/१२ उतारा (मोकळी जागा असल्यास)<br>५. प्रॉपर्टी कार्डचा उतारा (पेठेवर मिळकत असल्यास)<br>६. वारस नोंदीसाठी –मयत दाखला, सोसायटी पत्र, प्रतिज्ञापत्र, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, वाटपपत्र. उरील अ.क्र. १ ते५ मधील आवश्यक कागदपत्रे |
| **४. अर्जाचा नमुना** | :– करआकारणी विभाग पीटी ५ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रू. ५०/–<br>मा. स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दिनांक ३१.३.२०१५ अन्वये करपात्र रक्कम रू. १ ते ५०० – रू. १०००/– च्या पुढील प्रत्येक शंभरास रू. ३०/–, कौटुंबिक बदल निवासीसाठी १ ते ५०० पर्यंत रू. २०/– व त्यापुढील प्रत्येक शंभरास रू. १५/– फी भरावी लागेल. कौटुंबिक बदल बिगरनिवासी व मोगळया **जागेसासाठी** १ ते ५०० पर्यंत रू. ५००/– व त्यापुढील प्रत्येक शंभरास रू. ३०/– फी भरावी लागेल. |
| खरेदीखत न करता केवळ कंपनीच्या नावातील दुरूस्ती व बदल– करपा.त्र रक्कम रू. १ ते ५०० पर्यंत रू.५०० व त्यापुढील प्रत्येक शंभरास रू. ३०/– फी भरावी लागेल | संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– १५ दिवस |
| **८. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आहे ते कलम** | :–मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ (२) |
| **९. शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | मा. स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दिनांक ३१.३.२०१५ |
| **१०. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा कालावधी |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ लेखनिक | १० दिवस |
| तिसरा स्तर | विभागप्रमुख | २ दिवस |
| चौथा स्तर | क्षेत्रिय अधिकारी, सहा. करआकारणी व करसंकलन प्रमुख | २ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

६)        <u>कामाचे नाव :– मिळकतकर थकबाकी दुरूस्तीबाबत. (फॉर्म नं. पीटी ६)</u>

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– मिळकतकराचे बिलातील थकबाकी दुरूस्ती अर्ज |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकर थकबाकी भरल्याच्या पावत्या |
| **४. अर्जाचा नमुना** | :– करआकारणी विभाग पीटी ६ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रु. २५/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून १ महिना |
| **८. शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | :– १. मा. करआकारणी व करसंकलन प्रमुख ठराव क्र. १०३<br>दिनांक २५.४.२००५ |
| **९. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालाव** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | २ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | १० दिवस |
| तिसरा स्तर | विभागप्रमुख | १० दिवस |
| चौथा स्तर | क्षेत्रिय अधिकारी, सहा. करआकारणी व करसंकलन प्रमुख | ८ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

७)　**कामाचे नाव :– दुबार/विकसित/पाडलेली मिळकत शून्य करणेबाबत. (फॉर्म नं. पीटी ७)**

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– दुबार/विकसित/पाडलेली मिळकत शून्य करणेबाबत |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :–१. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकर थकबाकी भरलेली शेवटची पावती<br>३. भोगवटापत्राची प्रत.<br>४. दुबार मिळकत असल्यास येणा–या दोन्ही बिलांच्या प्रती.<br>५. एकाच मिळकतीची दोन बिले येत असल्याबाबत मिळकतदाराचे प्रतिज्ञापत्र |
| **४. अर्जाचा नमुना** | :– करआकारणी विभाग पीटी ७ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रु. २५/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **६. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून २ महिने |
| **७. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आहे ते कलम** | :– मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ नियम ६ (१ नुसार ) |
| **८. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालावधी** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | २० दिवस |
| तिसरा स्तर | विभागीय निरीक्षक | ७ दिवस |
| चौथा स्तर | बिल विभाग प्रमुख (क्षेत्रिय व संपर्क कार्यालयाकडील) | १५ दिवस |
| पाचवा स्तर | आकारणी विभाग | ५ दिवस |
| सहावा स्तर | संगणक विभाग | ३ दिवस |
| सातवा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | ३ दिवस |
| आठवा स्तर | कर आकारणी व कर संकलन प्रमुख | ५ दिवस |
| नववा स्तर | दाखला काढणे – संगणक विभाग | १ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

८)    <u>कामाचे नाव :– मिळकतीच्या क्षेत्रफळातील दुरूस्ती. (फॉर्म नं. पीटी ८)</u>

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– मिळकतीच्या क्षेत्रफळातील दुरूस्ती |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकर थकबाकी नसल्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र<br>३. खरेदीखत, इंडेक्स – २<br>४. जागेचा नकाशा<br>५. सँक्शन प्लॅनची प्रत |
| **४. अर्जाचा नमुना** | :–:– करआकारणी विभाग पीटी ८ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रु. २५/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून २ महिने |
| **८. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आहे ते कलम** | :–मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८५ अन्वये |
| **९. शासन निर्णय, आदेश, परिपत्रक, ठराव इ.** | :– १. मा. महापालिका आयुक्त ठ.क्र.६/६३, दि. ११/६/२००१ अन्वये<br>मआउआवि/१२७,दिनांक ७.७.२००७ |
| **१०. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | २० दिवस |
| तिसरा स्तर | विभागीय निरीक्षक | ७ दिवस |
| चौथा स्तर | बिल विभाग प्रमुख (क्षेत्रिय व संपर्क कार्यालयाकडील) | १५ दिवस |
| पाचवा स्तर | आकारणी विभाग | ५ दिवस |
| सहावा स्तर | संगणक विभाग | ३ दिवस |
| सातवा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | ३ दिवस |
| आठवा स्तर | कर आकारणी व करसंकलन प्रमुख | ५ दिवस |
| नववा स्तर | दाखला काढणे –संगणक विभाग | १ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

९)<u>कामाचे नाव :– **मिळकतकरातील पाणीपट्टी निवासी व बिगरनिवासी मीटरप्रमाणे नोंद घेणेबाबत. (फॉर्म नं. पीटी ९)**</u>

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– मिळकतकरातील पाणीपट्टी निवासी व बिगरनिवासी मीटरप्रमाणे नोंद घेणेबाबत |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. पाणीपट्टीचे बिगर निवासी दराचे देयक<br>३. विकास अभियंता, पाणीपुरवठा यांचेकडील पत्र. |
| **४. अर्जाचा नमुना** | :– करआकारणी विभाग पीटी ९ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रु. २५/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून २ महिने |
| **८. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालावधी** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | १५ दिवस |
| तिसरा स्तर | संगणक विभाग | ७ दिवस |
| चौथा स्तर | पाणीपुरवठा विभाग | २० दिवस |
| पाचवा स्तर | आकारणी विभाग | ५ दिवस |
| सहावा स्तर | संगणक विभाग | ३ दिवस |
| सातवा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | ३ दिवस |
| आठवा स्तर | कर आकारणी व करसंकलन प्रमुख | ५ दिवस |
| नववा स्तर | दाखला काढणे –संगणक विभाग | १ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

## १०) कामाचे नाव :– मिळकतीच्या आकारणी/ठरावबंद उतारा मिळणेबाबत. (फॉर्म नं. पीटी १०)

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– मिळकतीच्या आकारणी/ठरावबंद उतारा मिळणेबाबत |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकराची रक्कम भरलेल्या पावतीची प्रत |
| **४. अर्जाचा नमुना** | :–करआकारणी विभाग पीटी १० |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** कार्यालय | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** कार्यालय | :– रक्कम रु. २५/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून ११ दिवस |
| **८. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र /जन्म–मृत्यू नोंदणी विभाग | २ दिवस |
| दुसरा स्तर | आकारणी विभाग/बिल विभाग | ८ दिवस |
| तिसरा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

**वरील पीटी १ ते पीटी १० फॉर्म व्यतिरिक्त अन्य कामाच्या संदर्भात खालीलप्रमाणे फॉर्म तयार करण्यात आलेले आहेत.**

११) मिळकतीवरील नावात व घरांकामध्ये दुरुस्ती

| | |
|---|---|
| **१. विषय** | **:–** मिळकतीवरील नावात व घरांकामध्ये दुरुस्ती |
| **२. खात्याचे नाव** | **:–** कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | **:–** १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकराची रक्कम भरलेल्या पावतीची प्रत<br>३. नंबर दुरूस्तीबाबत – सातबारा, इंडेक्स, करारनामा, रजिस्ट्रेशन, सोसायटी एन.ओ.सी. इ.<br>४. नावातील दुरूस्तीसाठी –सोसायटी एन.ओ.सी., सातबारा, इंडेक्स, करारनामा, गॅजेटची प्रत इ. |
| **४. अर्जाचा नमुना** | **:–** साध्या पेपरवर अर्ज |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | **:–** संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | **:–** फी नाही. संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | **:–** अर्ज दिल्यापासून १५ दिवस |
| **८. निर्णय घेणारे अधिकारी** | **:–** |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालावधी** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक/विभागीय निरीक्षक | ७ दिवस |
| तिसरा स्तर | आकारणी विभाग | ५ दिवस |
| चौथा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ दिवस |
| पाचवा स्तर | संगणक विभाग प्रमुख | १ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

## १२) बिगरनिवासी जागा रिकामी असल्याबाबत द्यावयाची नोटीस

| | |
|---|---|
| **१. विषय** | :–बिगरनिवासी जागा रिकामी असल्याबाबत द्यावयाची नोटीस |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :–१. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकराचे चालू वर्षाची संपूर्ण रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स<br>३. जागा रिकामी राहणार असल्याबाबत आवश्यक ती कागदपत्रे. (सोसायटीचे प्रमाणपत्र, नोंदणीकृत करारनामा/ताबेपावती, डिपॉझिट परत केल्याची पावती, मिळकत बंद असलेबाबत विद्युत मंडळ यांचे बिलाची प्रत. ) |
| **४. अर्जाचा नमुना** | :– साध्या पेपरवर अर्ज<br>जागा रिकामी असल्याबाबत मिळकतदार यांनी पुढील सहा महिन्याचा कर अगोदर भरून प्रतिवर्षी १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ३० सप्टेंबर नंतर मागील सहा महिन्यात जागा रिक्त असल्याने केलेल्या अर्जाबाबत रिफंडबाबत क्लेम करणे आवश्यक आहे. १ ऑक्टोबर नंतर पुन्हा जागा रिक्त असल्यास पुढील सहा महिन्याचा अगाऊ टॅक्स भरून मार्च महिन्यात रिफंडबाबत क्लेम करणे आवश्यक आहे. (झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे. ) |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– फी नाही. संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून २ महिने |
| **८. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आहे ते कलम** | :–मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ परिशिष्ट ८ नियम ५६ व ५७ |
| **९. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| स्तर | पदनाम | निर्णयासाठी लागणारा का |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | २ दिवस |
| दुसरा स्तर | गणक विभाग | १५ दिवस |
| तिसरा स्तर | पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक | १ महिना |
| चौथा स्तर | गणक विभाग | १३ दिवस |
| पाचवा स्तर | मुख्य लेखापाल | १५ दिवस |
| सहावा स्तर | उप आयुक्त (विभागीय कार्यालय) | १० दिवस |
| सातवा स्तर | गणक विभाग | २ दिवस |
| आठवा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ दिवस |
| नववा स्तर | कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ दिवस |

## १३) कोर्ट ऑर्डरनुसार करपात्र रक्कम निश्चित करून रकमेचे रिफंड करणे

| | |
|---|---|
| **१. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **२. विषय** | :– कोर्ट ऑर्डरनुसार करपात्र रक्कम निश्चित करून रकमेचे रिफंड करणे |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकराचे चालू वर्षाची संपूर्ण रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स<br>३. कोर्ट ऑर्डरची प्रत<br>४. मा. विधी सल्लागार यांचा अभिप्राय |
| **४. अर्जाचा नमुना** | :– साध्या पेपरवर अर्ज |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– फी नाही. संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून ३ महिने |
| **८. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आहे ते कलम** | :– मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ परिशिष्ट ८ नियम ४०६ अन्वये केलेल्या अपिलासंदर्भात |
| **९. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालावधी** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र | २ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक | १५ दिवस |
| तिसरा स्तर | विभागीय निरीक्षक | ५ दिवस |
| चौथा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | २ दिवस |
| पाचवा स्तर | कर आकारणी व कर संकलन प्रमुख | २ दिवस |
| सहावा स्तर | आकारणी विभाग प्रमुख व संगणक विभाग प्रमुख | २ दिवस |
| सातवा स्तर | पेठ लेखनिक | १५ दिवस |
| आठवा स्तर | विभाग प्रमुख | ५ दिवस |
| नववा स्तर | गणक | ५ दिवस |
| दहावा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख व कर आकारणी व कर संकलन प्रमुख | ३ दिवस |
| अकरावा स्तर | मुख्य लेखापाल | १० दिवस |
| बारावा स्तर | उप आयुक्त क्षेत्रिय कार्यालय | १० दिवस |
| तेरावा स्तर | पेठ लेखनिक/विभाग प्रमुख/क्षेत्रिय अधिकारी | २ दिवस |
| चौदावा स्तर | गणक, सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख व करआकारणी व कर संकलन प्रमुख | २ दिवस |
| पंधरावा स्तर | मुख्य लेखापाल | १० दिवस |

टिप :– कोर्ट ऑर्डरनुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.(झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे. )

## १४) २० डिसेंबर ते १५ जानेवारी या मुदतीतील जाहीर प्रकटनानुसार अर्जाची पूर्तता.

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– २० डिसेंबर ते १५ जानेवारी या मुदतीतील जाहीर प्रकटनानुसार अर्जाची पूर्तता |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकराची रक्कम भरलेल्या पावतीची प्रत<br>३. दुरूस्तीबाबत आवश्यक ती कायदेशीर कागदपत्रे |
| **४. अर्जाचा नमुना** | :–साध्या पेपरवर अर्ज |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– फी नाही. संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :–अर्ज दिल्यापासून १५ दिवस |
| **८. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ मधील ज्या कलमांचे आधारे काम करणे आहे ते कलम** | :– मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ परिशिष्ट ८ नियम १३ व १५ (१) |
| **९. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालावधी** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र /आकारणी विभाग | १ दिवस |
| दुसरा स्तर | पेठ निरीक्षक/ विभागीय निरीक्षक | ७ दिवस |
| तिसरा स्तर | आकारणी विभाग | ५ दिवस |
| चौथा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ दिवस |
| पाचवा स्तर | संगणक विभागप्रमुख | १ दिवस |

टिप :–झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

# नागरिकांची सनद

| | |
|---|---|
| **१. विषय** | :– मिळकतीच्या आकारणी/ठरावबंद उतारा मिळणेबाबत |
| **२. खात्याचे नाव** | :– कर आकारणी  व कर संकलन कार्यालय |
| **३. आवश्यक कागदपत्रे** | :– १. मिळकतीचे चालू वर्षाचे देयक<br>२. मिळकतकराची रक्कम भरलेल्या पावतीची प्रत |
| **४. अर्जाचा नमुना** | :–करआकारणी विभाग पीटी १५ |
| **५. अर्जाचा नमुना मिळण्याचे ठिकाण** | :– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय, मुख्य कार्यालय |
| **६. आवश्यक फी व अर्ज भरणेचे ठिकाण** | :– रक्कम रु. ३०/– संबंधित क्षेत्रिय कार्यालय, संबंधित संपर्क कार्यालय |
| **७. अंतिम निर्णयासाठी लागणारा कालावधी** | :– अर्ज दिल्यापासून ३ दिवस |
| **८. निर्णय घेणारे अधिकारी** | :– |

| **स्तर** | **पदनाम** | **निर्णयासाठी लागणारा कालावधी** |
|---|---|---|
| पहिला स्तर | नागरी सुविधा केंद्र /जन्म–मृत्यू नोंदणी विभाग | १ दिवस |
| दुसरा स्तर | आकारणी विभाग/बिल विभाग | १ दिवस |
| तिसरा स्तर | सहा. कर आकारणी व कर संकलन प्रमुख | १ दिवस |

टिप :– झेरॉक्स प्रती सांक्षाकित करणे आवश्यक आहे.

## १७) पुणे महानगरपालिका, करआकारणी व करसंकलन विभागाने मिळकतकराअंतर्गत केलेल्या विविध योजनांबाबत माहिती.

### १) मुदतीत कर भरल्यास फक्त चालू सरकारी वर्षातील (प्रतिवर्षी) मिळकतरांतर्गत येणाऱ्या सर्वसाधारण कराच्या सर्वसाधारण करात १०% सवलत देणेबाबत.

महाराष्ट्र शासन राजपत्र, बुधवार, जानेवारी १४, २००९/पौष २४, शके १९३०,(रजिस्टर नं. एमएच/एमआर/साऊथ–२२९,२००६–०८.) नुसार मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मध्ये नव्याने सुधारणा करण्यात आलेल्या तरतूदींनुसार मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २२६६ दिनांक २६–०२–२००९ अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतकर देण्यास प्रथमत: जबाबदार असलेल्या व्यक्ती/मिळकतदार चालू सरकारी वर्षातील मिळक़तकराचे मागणीची संपूर्ण रक्कम आणि मागील  थकबाकी असल्यास बाकीसह अधिक दंडासह संपूर्ण रक्कम १ एप्रिल २००९ ते ३१ मे २००९ या मुदतीत मनपाकडे भरतील त्यांना फक्त चालू सरकारी वर्षातील (प्रतिवर्षी) मिळकतरांतर्गत येणाऱ्या सर्वसाधारण कराच्या रकमेत मागणी रकमेत १०%  सूट देणेबाबत (सेवाशूल्क व शासनाचे कराव्यतिरिक्त) कार्यवाही झाली आहे.

सन २०१० पासून महाराष्ट्र शासन राजपत्र  जानेवारी १४ ,२००९ पौष २४ शकमे १९३० अन्वये मुंबई प्रांतिक मनपा अधिनितय १९४९ कलम १४० अ अन्वये – फक्त चालू सरकारी वर्षातील (प्रतिवर्षी) मिळकतरांतर्गत येणारी एकूण मागणी विचारात घेऊन त्यामधील सर्वसाधारण कराची चालू मागणीची रक्कम रू. २५,०००/– पेक्षा कमी आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत १०% सूट व ज्यांची सर्वसाधारण कराची चालू  मागणीची रक्कम रू. २५,००१/– पेक्षा अधिक आहे त्यांना सर्वसाधारण कराच्या चालू मागणी रकमेत ५% सूट देण्यात येते व प्रत्येक वर्षी याप्रमाणे मा.मुख्यसभेची मान्यता घेवून पुढील कार्यवाही करण्यात येते.

**सन २०१२–२०१३ या वर्षात माहे एप्रिल व मे अखेर ३,४३,७३३ मिळकतदारांना मुदतीत कर भरल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये ५,८१,४१,०८७/–इतकी सवलत दिली असून १.४.२०१२ ते ३०.६.२०१२ अखेर ३२६ कोटी ३२ लक्ष इतका मिळकतकर वसूली झाली आहे.**

**सन २०१३–२०१४ या वर्षात माहे एप्रिल व ३१ मे अखेर ३७६१५९ मिळकतदारांना मुदतीत कर भरल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये सुमारे  ७,.९२ कोटी पेथा अधिक सवलत दिली असून १.४.२०१३ ते ३१.५.२०१३ अखेर ४०६.२३  कोटी   इतका मिळकतकर वसूली झाली आहे.**

**सन २०१४–२०१५ या वर्षात माहे १ एप्रिल व ३१ मे २०१४ अखेर** ३८४७३९ **मिळकतदारांना मुदतीत कर भरल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये सुमारे  ८,५७,१२,३७२  सवलत दिली असून १.४.२०१४ ते ३१.५.२०१४ अखेर ४२०.१४ कोटी   इतका मिळकतकर वसूली झाली आहे.**

**सन २०१५–२०१६ या वर्षात माहे  १ एप्रिल व ३१ मे   २०१५ अखेर ४२९५३९ मिळकतदारांनी मुदतीत कर भरल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये सुमारे  १०,५१,८६,७४६  सवलत दिली असून १.४.२०१५ ते ३१.५.२०१५ अखेर ५२१.३५ कोटी   इतका  मिळकतकर वसूल  झाला आहे.**

**२०१६–२०१७या वर्षात माहे  १ एप्रिल व ३० जून २०१६ अखेर  ५५५६५६ मिळकतदारांनी मुदतीत कर भरल्यामुळे सर्वसाधारण करामध्ये सुमारे  १३,०३,१५,७१७  सवलत दिली असून १.४.२०१६ ते ३०.६.२०१६ अखेर ६००.७२ कोटी   इतका  मिळकतकर वसूल  झाला आहे.**

### २) निवासी मिळकतीमध्ये सोलर सिस्टिम,व्हर्मीकल्चर प्लॅन्ट (गांडूळ खत प्रकल्प) तसेच रेन वॉटर हर्व्हेस्टिंग या ३ प्रकल्पांपैकी एक प्रकल्प राबविला असल्यास ५ % व दोन प्रकल्प राबविले असल्यास मिळकतकरामध्ये १० %  सूट देणेबाबत :–

१. सौरउर्जेचा वापर

२. पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे,

३. ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे.

या तीन पैकी दोन गोष्टीची अंमलबजावणी करणारे मिळकतदार यांनी तसा अर्ज केल्यानंतर व त्या संदर्भात संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर मिळकतधारकांनी निवासी मिळकतीमध्ये सोलर सिस्टिम,व्हर्मीकल्चर प्लॅन्ट (गांडूळ खत प्रकल्प) तसेच रेन वॉटर हर्व्हेस्टिंग या ३ प्रकल्पांपैकी एक प्रकल्प राबविला असल्यास ५ % व दोन प्रकल्प राबविले असल्यास मिळकतकरामध्ये १० % सूट देणेबाबत कार्यालयीन आदेश जा.क्र. मआ/उआवि/१२७ दिनांक ७.७.२००७. मा.मुख्यसभा ठराव क्रं.८५ दिनांक १३–०७–२००७. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/७९६ दि.२७.०१.२००९ अन्वये कार्यवाहीस मान्यता मिळाली असून त्याची अंमलबजावणी सन २००७–२००८ पासून सुरू केलेली आहे.

सन २०११ पासून १) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीन पैकी दोन बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या दराच्या १०% सूट(शासनाचे कर व पाणीपट्टी व्यतिरिक्त)२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या निवासी मिळकतींमध्ये (१) सौरऊर्जा वापर, (२) पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ते पुन्हा रिसायकलिंग करुन वापरात आणणे, (३) ओला व सुका कचरा वेगळा करुन गांडूळखत प्रकल्प राबविणे. या तीन पैकी एका बाबींची अंमलबजावणी करणारे निवासी मिळकतदाराच्या मिळकतीस लागू असणाऱ्या चालू करांच्या (शासनाचे कर व पाणीपट्टी व्यतिरिक्त) ५ %.

| सन | सोलर | गांडूळखत | रेन | सोलर +गांडूळ खत | गांडूख खत+रेन | सोलर+ गांडूख खत+रेन | एकूण | सवलती ची रक्कम लाखात |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००७–२००८ | ० | २९ | ० | १२३६ | ० | ० | १२६५ | |
| २००८–२००९ | ६४८ | १२०६ | २ | १५७४ | ० | ० | ३४३० | |
| २००९–२०१० | १२२६ | १९२० | ० | ४२९६ | ४७९ | ० | ७९२१ | |
| २०१०–२०११ | १९७० | ४५८४ | ३ | ४८८८ | ५४३ | १५ | १२००३ | ०.४७ |
| ११–१२ | २९५९ | ८६४६ | ५६ | २३८५ | ७४८ | १३ | १४८०४ | ०.५२ |
| १२–13 | ४०७२ | १०४०४ | ३६७ | ७२८३ | १०२४ | २० | २३१७० | १.०१ |
| १३–१४ | ५८४२ | १३६७७ | ४०२ | ८५९६ | १७९६ | १२२ | ३००७५ | १.४० |
| १४–१५ | ७७५४ | १६०५९ | ४५२ | ९९४१ | २०१३ | १३६ | ३६३५५ | १.६८ |
| १५–१६ | १०३६४ | २१०८१ | ७२४ | ११९९१ | २४७१ | १५५ | ४५९८६ | २.३१ |
| १६–१७ | १२०९१ | २७५५४ | ११३८ | १२५७४ | २९३४ | ७७४ | ५७०६५ | |

## २) <u>स्वातंत्र्य सैनिक :–</u> पुणे मनपा क्षेत्रातील स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये मिळकत करामधील सर्व साधारण कर संपूर्ण पणे माफ करणेबाबत.

पुणे शहरातील स्वातंत्र्य सैनिकांना त्यांच्या मालकीच्या मिळकतीमध्ये मिळकतकरामधील सर्वसाधारण कर संपूर्ण माफ करणेबाबत मा. मुख्य सभा ठराव क्रमांक २८७, दि.१७.१०.२००६ अन्वये मान्यता मिळाली असून, महाराष्ट्र शासन निर्णय क्रं. पीएमसी/३००८/१६८/प्र.क्र. ७८/०८/नवि–२२, दि. ९/४/२००८ अन्वये मान्यता मिळाली असून पुणे शहरातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेले अर्ज व कागदपत्रे तपासणी करुन शासन निर्णयातील अटींनुसार सर्व साधारण कराची माफी देण्यात येते.

(१) पुणे शहरातील ज्या स्वातंत्र्य सैनिकांचे मिळकतीची मिळकतकर आकारणी रजिस्टरी नोंद असेल, अशा स्वातंत्र्य सैनिकाने स्वत: अर्ज केल्यास, त्याचे मालकीच्या फक्त एकाच मिळकतीस व स्वत: वास्तव्यास असलेल्या व महाराष्ट्राचे नागरिक असणाऱ्या निवासी मिळक़तीस अशा प्रकारची सूट देण्यात येईल.

(२) स्वातंत्र्य सैनिक हयात असल्याबाबत प्रत्येक वर्षी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांसह (उदा.रहिवाशी दाखला, शिधापत्रिका इ.) हयातीचा दाखला पुणे मनपाकडे सादर करणे आवश्यक आहे.

(३) स्वातंत्र सैनिकाचे निधनानंतर मिळकतकरातील मिळणारी सवलत त्याच्या पुढील आर्थिक वर्षापासून रद्द करण्यात येईल. याबाबत स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईकांनी पुणे

म.न.पा.स लेखी कळविणे बंधनकारक राहील. सदर माहिती न कळविल्यास ज्या आर्थिक वर्षात निधन झाले, त्याच्या पुढील आर्थिक वर्षापासून सर्वसाधारण कराची मागणी करणेत येईल.

३१.३.२०१६ अखेर पुणे शहरातील ४७ इतकया स्वातंत्र्य सैनिकांना सर्वसाधारण करात माफी दिली असून त्याची रक्कम १,८८,०८१ ही आहे.

**४ माजी सैनिक :–**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या माजी सैनिकांच्या निवासी मिळकतीवरील मिळकतकरापैकी सर्वसाधारण करामध्ये सवलत दिली जाणार असून त्याबाबत खालीलप्रमाणे अटी लागू करण्याबाबत मा. स्थायी समिती ठ.क्र. १२२१, दि. ०६/११/२००८, मा. मुख्य सभा ठ.क्र. ०६, दि. २०/०५/२००९, मा. विधी सल्लागार यांचा अभिप्राय जा.क्र. एमपीओ/११९५, दि. २९/०७/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे.

(१) मिळकतकराअंतर्गत असलेल्या सर्वसाधारण करांस माफी देणे. इतर सर्व कर वसूल करणेस.

(२) माजी सैनिक हा निवृत्त वेतनधारक असावा किंवा त्यास युध्दामध्ये अपंगत्व आलेले असावे. ( सैनदलामध्ये कमीत कमी १५ वर्षे सेवा केलेले असावे. )

(३) शहीद माजी सैनिकाची वीर पत्नी अथवा शहीद माजी सैनिकाची वीर माता अथवा पिता या तिन्हीपैकी एकाच मालमत्ता धारकांस व त्याच्या एकाच मिळकतीस सदर योजनेचा लाभ देता येईल.

(४) लाभार्थी यांनी प्रत्येक वर्षी हयात असल्याबाबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडून प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. निवृत्तवेतनधारक, माजी सैनिक, युध्दामधील जखमी सैनिक/ शहीद सैनिकाची माता/ पिता/ पत्नी यांचेपर्यतच अबाधित राहील त्यांचे मृत्यूनंतर सदर योजनेचा लाभ त्यांचे वारसांना देता येणार नाही.

(५) माजी सैनिक/ दिवंगत सैनिकांची माता / पिता/ पत्नी यांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लेखी मागणी करणे आवश्यक असून त्यासोबत डिसचार्ज पुस्तकाची छायांकित प्रत निवृत्त वेतन घेत असलेबाबत बॅकेंचे पत्र, शासन मान्यता प्राप्त माजी सैनिक संघटना व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडील ओळखपत्राची छायांकित प्रत देणे आवश्यक आहे.

(६) वरील व्यतिरिक्त या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने आवश्यक त्या बाबी / अटी समावेश करण्याचा मा. महापालिका आयुक्त यांना अधिकार राहील.
प्रस्तुत मान्यता विचारात घेऊन मुंबई प्रांतिक मनपा कलम ४५५ (१) (३) प्रमाणे कार्यवाही करुन कलम ४५४ व ४५५ (१) अन्वये कायद्यातील दूरूस्तीबाबत वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यात आले असून, नागरिकांच्या हरकती व सूचना मागवून पुन्हा फेर विषयपत्र मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्यसभेच्या मान्यतेसाठी सादर केले असून मा. मुख्य सभेच्या मान्यतेनंतर प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजुरीस शासनांकडे पाठविण्यात येऊन राज्य शासनाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. सर्वसाधारण करास माफीची अंमलबजावणी करण्याबाबत अद्याप निर्णय प्रलंबित असल्याने माजी सैनिकाच्या मिळकतींना करात सवलत देण्यात आलेली नाही. तथापी

**विषय : माजी सैनिकाच्या विधवा पत्नीच्या नावे तसेच उत्कृष्ट कामगिरीकरिता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना मिळकत करातून माफी देणेबाबत.**
**संदर्भ : शासन निर्णय संकिर्ण २०१६/प्र.क्र.५९/नवि २० दिनांक ५.४.२०१६ .**

वरील शासन निर्णयानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२७ अन्वये महानगरपालिका व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०५ अन्वये नगरपरिषदा, नगरपंचायती मालमत्ता कराची आकारणी करतात. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात राहणाऱ्या, देशासाठी प्राणची बाजी लावून, जीवाची पर्वा न करता निःस्वार्थीपणे देशाचे संरक्षण करताना बजाविण्यात आलेल्या उत्कृष्ट कामगिरीकरीता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या एका मालमत्तेच्या मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अशा कर माफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे असे आदेश प्राप्त झालेले आहेत.

शासन निर्णयानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८ मध्ये मालमत्ता करामध्ये सर्वसाधारण कर, पाणीपट्टी, सफाई कर, अग्निशामक कर, जललाभ कर, जलनिःस्सारण लाभ कर, मनपा शिक्षण उपकर यांचा समावेश होतो.

परंतू वृक्षसंवर्धन कर, शिक्षण कर, निवासी/बिगार निवासी, रोजगार हमी कर व मोठया निवासी जागेवरील कर याबाबत स्वतंत्र ॲक्ट असून त्यानुसार त्यांची कर आकारणी करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२ नुसार शहरातील निवासी व बिगरनिवासी मिळकतींना शासनाचे शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची आकारणी करण्यात येते. तसेच महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग विथ लार्जर रेसिडेंशियल प्रिमायसेस ॲक्ट १९७९ बाबत मोठया निवासी जागेवरील कर व वृक्ष संवर्धन कायदयाबाबतही प्रस्तुत शासन निर्णयामध्ये उल्लेख दिसून येत नाही.

सदर कायद्यातील तरतूद व शासन निर्णय विचारात घेता मिळकतराच्या बिलामध्ये सर्वसाधारण कर, पाणीपट्टी, सफाई कर, अग्निशामक कर, वृक्षसंवर्धन कर, जललाभ कर, जलनिःस्सारण लाभ कर, विशेष सफाई का, मनपा शिक्षण उपकर, शिक्षण कर, निवासी/बिगार निवासी, रोजगार हमी कर व मोठया निवासी जागेवरील कर यांचा समावेश होतो.

उत्कृष्ट कामगिरीकरीता संरक्षण दलातील शौर्य पदक धारकांना आणि माजी सैनिकांच्या विधवांना त्यांच्या नावावर असलेल्या एका मालमत्तेच्या मालमत्ता करातून सूट देण्याचा निर्णय घेता असला तरी पुणे मनपाकडून सदर मिळकतदारांस वृक्ष कर, निवासी शिक्षणकर मिळकत बिगर निवासी असल्यास त्याप्रमाणे शिक्षणकर व रोजगारहमी कर व निवासी मिळकत १५० चौ. मिटरपेक्षा जास्त असल्यास मोठया निवासी जागेवरील कर हे शासनाचे कर आकारणी करून मिळकतदारांस बिल पाठविणे व त्याची वसुली करावी लागणार आहे.

तरी, महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर अधिनियम १९६२, महाराष्ट्र टॅक्स ऑन बिल्डींग विथ लार्जर रेसिडेंशियल प्रिमायसेस ॲक्ट १९७९,महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील तरतूदीनुसार शासनाचे शिक्षणकर व रोजगारहमी कर, मोठया निवासी जागेवरील कर, वृक्ष कर यांना माफी देणे अगर कसे याबाबत आदेश होणेस सादर केलेले आहे. प्रस्तुत बाबीस मा. स्थायी समितीने मंजूरी दिली असून मा.मुख्यसभेने मंजूरी दिल्यानंतर दिनांक १.४.२०१६ पासून अशा मिळकतदारांस त्यांचे मिळकतकरामध्ये सवलत दिली जाईल.

## ५. मिळकतकर वाजवीभाडे दरसूची

सन २००७–२००८ मध्ये मुद्रांकशुल्काचा दर विचारात घेऊन व सन २००७–२००८ मधील मिळकतीच्या करआकारणीसाठी वाजवी भाड्याचे दर विचारात घेऊन त्याप्रमाणे पुणे मनपा हद्दीतील ५३ विभाग,६०० भाग याप्रमाणे विभागणी करून निवासी ,बिगरनिवासी, कार्यालय, मोकळया जागा यांच्या दर चौ. फूटाच्या दरमहा वाजवी भाडयाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. याची अमलबजावणी दिनांक १.४.२००७ पासून करण्यात आली असून मिळकतकर वाजवी भाडे दरसूची २००७–२००८ ही पुस्तीका थेट नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली असून ती पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. सन २०१०–२०११ व २०१२–१३ या आर्थिक वर्षापासून वाजवी भाड्याच्या दरामध्ये वाढ झालेली आहे.

सन २०१५–१६ मधील कमीतकमी व जास्तीतजास्त वाजवीभाडयाचे दर खालीलप्रमाणे

| Assessment Rate per Sq Pt Per mounth as on 31.3.2014 | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Residencial | | | | Non Residincial | | | | | Open plot | | | parking | | |
| | Rcc | Load ber | Teen sh | | Rcc | Load ber | Teen sh | office | | o p | NR op | | Res | Non Res | |
| min | 1.75 | 1.50 | 1.25 | | 5.50 | 4.50 | 3.50 | 3.50 | | 0.50 | 1.40 | | 0.50 | 1.40 | |
| max | 4.11 | 3.27 | 2.43 | | 13.10 | 10.20 | 7.30 | 6.78 | | 1.04 | 3.67 | | 1.04 | 3.67 | |

मिळकतकराचे ऑनलाइन ए फॉर्म भरणेसाठी वाजवीभाड्याचे अद्ययावत दर त्या त्या क्रमांकानुसार संगणकीय डेटाबेसमध्ये उपलब्ध असून सदर बाबत ५३ विभाग व ६०० भागाचे अ.क्र. अचूक ऑनलाइन ए फॉर्म भरतांना देणे आवश्यक आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या सर्व इमारती व जमिनींची कर आकारणी करण्यात येते. कर आकारणी झालेल्या सर्व मिळकतीना प्रतिवर्षांची मिळकत कराची बिले पाठवून मिळकत कराची वसूली १४ क्षेत्रिय कार्यालय व ७ संपर्क कार्यालय ,मुख्य कार्यालयात, नागरी सुविधा केंद्र,एचडीएफसी,आयसीआयसीआय बँक ऑनलाईन पेमेंट ,क्युऑक्स मशीन इ.मार्फत करण्यात येते. मिळकतीच्या कर आकारणीचे काम मुख्य कार्यालयातील पेठ निरीक्षक, विभागीय निरीक्षक, सहायक करआकारणी व करसंकलन प्रमुख, कर आकारणी व कर संकलन प्रमुख यांच्या मार्फत करण्यात येते. कर आकरणी झालेल्या सर्व ए फॉर्मच्या नोंदी आकारणी रजिस्ट्ररी करण्यात येवून आकारणीची नोटीस मान्य झाल्यानंतर मिळकत कराची बिले मुख्य कार्यालयातील संगणक विभागामार्फत काढण्यात येतात.

## ६. आय.टी. आणि आय.टी.एस. संस्था

महाराष्ट्र शासान क्रं. आय.टी.पी. २००३/सी.आर/३३११/ आयएनडी – इंडस्ट्रिज एनर्जी आणि लेबर डिपार्टमेंट, मंत्रालय, मुंबई– ३२, दि. १२ जुलै, २००३ महाराष्ट्र शासनाने आय.टी. आणि आय.टी.ई. एस. (INFORMATION TECHNOLOGY & INFORMATION TECHNOLOGY ENABLED SERVICES) योजना, २००३ मधील परिशिष्ट ४–६ SUPPORT OF IT & ITES UNITS BY URBAN LOCAL BODIES (b) या संस्थाना मिळकतीची आकारणी निवासी दराने करणेबाबत तसेच ज्या संस्थामध्ये डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज (DIRECTORATE OF INDUSTRIES) महाराष्ट्र शासनाचे प्रमाणपत्र असेल त्या आय.टी. आणि आय.टी.एस. संस्थांना दिनांक १.१०.२००३ पासून निवासी दराने आकारणी करणेबाबत मा. स्थायी समिती ठरावा क्रं. १०२७ दिनांक १७.१०.२००३ ने मान्यता देण्यात आली आहे. पुणे मनपा हद्दीत व समाविष्ट गावात आय.टी. आणि आय.टी.ई. एस. संस्थांनी भाडयाने मिळकती घेतल्या आहेत, अशा संस्थाची ( करपात्र रक्कम ) यापूर्वीच्या निवासी वाजवी भाडयाच्या दरमहा प्रती चौ. फुटाप्रमाणे दर रुपये २.६० याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे. सह. सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण २००८/जकात–सवलत/प्रक्र/९/नवि/३४, दि. ०४/०९/२००९ अन्वये माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवाघटकांना जकात/प्रवेशकर किंवा त्यांच्याऐवजी लावलेल्या अन्य उपकरातून किंवा करातून सूट देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून या सवलती दि. १४/०८/२०१४ पर्यंत चालू ठेवण्याबाबत निर्णय घेण्याचे कळविलेले आहे. मा.ए.एम.खान, सचिव (नगरविकास) विकास आयुक्त (उद्योग ) उद्योग संचालनालय मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र जा.क्र.अ.शा. प.क्रं.आयटीपी२०१०/(४८७)/उदयोग–२ दिनांक २९.३.२०१० अन्वये सदर सवलत पुणे शहरास लागू असल्याबाबत कळविलेले आहे.

आय टी मिळकतीस करआकारणीचे वाजवी भाड्याचे दर खालीलप्रमाणे.

| आय टी मिळकतीसाठी | | शहरातील इतर बिगरनिवासी मिळकतीसाठी |
|---|---|---|
| **कालावधी** | **वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करण्यासाठी वाजवी भाडयाचा दर** | **वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करण्यासाठी वाजवी भाडयाचा दर** |
| **१.४.२००३ ते ३१.०३.२००४ पर्यंत** | प्रति चौ. फु. वाजवी भाडयाचा दर १.३० पैसे | **२.६०** |
| **१.४.२००४ ते ३१.०४.२००७ पर्यंत** | प्रति चौ. फु. वाजवी भाडयाचा दर २.६० पैसे | **कमीत कमी रू ४.०० जास्तीत जास्त रू.१०.०० प्रती चौ. फूट** |
| **१.४.२००७ ते ३१.०३.२०१० अखेर** | प्रति चौ. फु. वाजवी भाडयाचा दर २.६० पैसे | **कमीत कमी रू ४.०० जास्तीत जास्त रू.११.८० प्रती चौ. फूट** |
| **दि.०१/०४/२०१० पासून** | कमीत कमी रू.४.५० व जास्तीत जास्त रू. १२.३० प्रती चौ. फूट प्रती महा | **कमीत कमी रू.४.५० जास्तीत जास्त रू.१२.३०** |
| दि.०१/०४/२०११पासून | कमीत कमी रू.५ व जास्तीत जास्त रू. १३.३० प्रती चौ. फूट प्रती महा | कमीत कमी रू.५ व जास्तीत जास्त रू. १३.३० प्रती चौ. फूट प्रती महा |

| | | |
|---|---|---|
| | १४.८.२०१४ रोजी मुदत संपली असून मुदतवाढीबाबत शासनाकडे पंत्रव्यवहार चालू असून अदयाप पुढील निर्णय घेण्यात आला नाही. | |

पुणे शहरातील आय टी व आयटीईएस च्या नोंदणीकृत असलेल्या मिळकतींची माहिती खालीलप्रमाणे

| IT PROPERTIES DETAIL LIST | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | DATE: 03 SEP 2016 |
| PROPERTY TAG | PROPERTY COUNT | RESI ARV | NR ARV | OPEN ARV | TOTAL ARV | TOTAL DEMAND AMT | TOTAL COLLECTION | DUES AMT |
| IT PROPERTY BEFORE 01 APR 2010 | 702 | 43,66,715 | 16,74,68,690 | 3,99,450 | 17,22,34,855 | 177,57,67,916 | 144,12,69,886 | 30,17,06,666 |
| IT PROPERTY AFTER 01 APR 2010 | 189 | 11,82,250 | 7,65,41,800 | 0 | 7,77,24,050 | 39,46,04,615 | 34,31,94,979 | 4,66,54,558 |
| **TOTAL** | **891** | **55,48,965** | **24,40,10,490** | **3,99,450** | **24,99,58,905** | **217,03,72,531** | **178,44,64,865** | **34,83,61,224** |

७.**झोपडपट्टी पुनर्वसन योजना :**

१) महाराष्ट्र शासन अधिसूचना – नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, दि.०७/११/९७. अन्वये पुणे मनपा झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत अपेडिक्स टी नियमावली नुसार गठीत उच्चधिकार समितीने दि. २१/२/२००० चे बैठकीमध्ये घेतलेला निर्णयानुसार मा.मुख्यसभा ठराव क्रं.१९५९ दिनांक २६.३.२००३ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र राज्य शासनाने संदर्भ क्र. १ मध्ये नमूद केलेल्या आदेशानुसार पुणे महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी सुधारणेच्या योजनेअंतर्गत निवासी वापरासाठी बांधण्यात आलेल्या इमारतींवर मिळकत कराची आकारणी खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यास मान्यता दयावी, अशी मा. मुख्य सभेस शिफारस आहे.

| अ.क्र. | कालावधी | मिळकत कराचा कमी केलेला दर |
|---|---|---|
| १. | पहिल्या वर्षापासून दहाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसुल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या २०%. |
| २. | अकराव्या वर्षापासून पंधराव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसुल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या ५०%. |
| ३. | पंधराव्या वर्षापासून विसाव्या वर्षापर्यंत | विशिष्ट वर्षात वसुल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या ८०%. |
| ४. | वीस वर्षापासून पुढे | विशिष्ट वर्षात वसुल करण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या १००%. |

टिप :- वरील मिळकत करामध्ये महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण कराचा समावेश नाही तसेच बिबवेवाडी पुनर्वसन योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या प्रती ओटा रूपये ३३६/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारली जात असल्याने त्याच दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल.

दिनांक ३१/०३/२०१६ अखेर वरील प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या पुंर्नवसन झालेल्या सुमारे २०६७ इतक्या मिळकतींना करामध्ये सवलत दिली आहे.

## <u>१८) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ –अवैध इमारतींवर शास्ती बसविणे–मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/६८०दि. ०३/११/२००८.</u>

.

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२ राजपत्रात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ,नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ मध्ये नवीन कलम २८२ अ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ मध्ये नविन कलम १८९ अ असे समाविष्ट करून अवैध बांधकाम व पुर्नबांधकाम कोणते राहील हे नमूद केले आहे आणि तशा इमारतींवर बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती लावण्याबाबत तरतूदमुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ –अवैध इमारतींवर शास्ती बसविणे– अंमलबजावणी करणेबाबत सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२ राजपत्र दि. ०४/०१/२००८.महाराष्ट्र शासन एमयुबी/एमयुपी/२००९/१७९/प्र.क्र.४०/०९/नवि–१९ दि.०५/०२/२००९ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे करण्यात आली आहे. तसेच या शास्तीमुळे अवैध बांधकामाच्या बाबतीत त्यांच्याविरूध्द दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा येणार नाही आणि असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे याचा असे अवैध बांधकाम किंवा पूर्नबांधकाम हे अस्तीत्वात असेल तोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुर्नबांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही असे नमुद केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील क्रमांक एमयुबी/एमयुपी–२००९/ १७९ /प्रक्र.४०/०९/नवि–१९ दिनांक ०५ फेब्रुवारी २००९ रोजीच्या पत्रान्वये या संदर्भात मा.लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने असा खुलासा करण्यात येत आहे की, उपरोक्त अधिनियम दुरूस्ती म्हणजे सन २००८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.२ हा दिनांक ०४–०१–२००८ पासुन अंमलात आला असल्याने त्या तारखेस व त्या तारखेनंतर जे अवैध बांधकाम व पुर्नबांधकाम केले जाईल, त्यांच्या बाबतीत सदर शास्तीची तरतूद लागू होईल असे कळविले आहे. प्रस्तुतबाबत कार्यवाही करणेसाठी मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/६८० दि. ०३/११/२००८ मान्यता मिळाली असून सदर मान्यतेनुसार दिनांक ४.१.२००८ पासून कार्यवाही सुरू केली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील ज्या मिळकतीस बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देण्यात आलेली आहे. परंतु काही कारणास्तव बांधकाम पुर्णत्वाचा दाखला (Occupation Certificate ) देण्यात आलेला नाही अशा मिळकतीवर यापुर्वी मिळकतकर विभागाकडून तीनपट शास्ती आकारण्यात येत होती. <u>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६७ अ नुसारच्या मिळकतकर आकारणीबाबत</u> कार्यालय परिपत्रक टीजीओ ५१७३,दि.२०/१२/२०१४ मधील अ.क्र.२ (अ) मध्ये ''अशा मिळकतींवर **<u>मान्य नकाशाप्रमाणेच बांधकाम असल्याबाबत</u>** बांधकाम विभागाकडून दाखला सादर केल्यानंतर पुर्वी केलेली ३ पट करआकारणी चालू आर्थिक वर्षापासून म्हणजे दि.०१/०४/२०१४ पासून एकपट दराने करणेत यावी व ज्या मिळकतधारकांनी चालू आर्थिक वर्षाची ३ पट रक्कम भरली आहे त्यांची एकपट रक्कम वगळता उर्वरीत रक्कम पुढील आर्थिक वर्षासाठी समायोजित करण्यात यावी.'' असे आदेश काढण्यात आलेले होते.

वरील परिपत्रकानुसार ज्या मिळकतींची करआकारणी झालेली नाही व ते नव्याने करआकारणीसाठी आल्यास त्यांना तीनपट शास्ती न आकारता प्रत्यक्ष राहत असलेल्या दिनांकापासून सिंगल दराने करआकारणी करण्यात येते. याकरीता मिळकतींवर **<u>मान्य नकाशाप्रमाणेच बांधकाम असल्याबाबत</u>** बांधकाम विभागाकडून दाखला सादर केल्यानंतर पुर्वी केलेली ३ पट करआकारणी, आकारणी दिनांकापासून एकपट दराने करणेत यावी व अशा प्रकारच्या ज्या मिळकतधारकांनी ३ पट रक्कम भरली आहे त्यांची एकपट रक्कम वगळता उर्वरीत रक्कम पुढील आर्थिक वर्षासाठी समायोजित करण्यात यावी.'' याप्रमाणे दुरुस्ती व त्याची अंमलबजावणी करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी ठ.क्र.६/१३०, दि.२०/०७/२०१५ अन्वये मंजूरी दिली आहे.

१०) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५०क नुसार मागील ६ वर्षापासून मिळकतकर आकारणीपासून सन २०१० मध्ये झालेल्या सुधारणाबाबत.

**दिनांक :-**

## जाहीर प्रकटन

**विषय:-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये नव्याने समाविष्ठ केलेल्या कलम **१५० क** बाबत.

महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग ४ सोमवार, एप्रिल १८,२०११ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५० नंतर कलम ''**१५० क**'' हे नव्याने समाविष्ठ करण्यात आले आहे. **''या अधिनियमान्वे बसविण्यायोग्य असलेले कोणतेही कर किंवा फी यांचा भरणा करण्यास पात्र असलेल्या कोणत्याही कारणास्तव, जर कोणत्याही वर्षातील करनिर्धारण केले गेले नसेल तर, आयुक्तास, ज्या दिनांकास ती व्यक्ती, आकारणी करण्यास पात्र झाली असेल, त्या दिनांकापासून सहा वर्षाच्या आत, कोणत्याही वेळी, अशा व्यक्तींवर कराची आणि देय फीची आकारणी करणारी नोटीस बजावता येईल आणि अशी नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत त्याव्दारे त्यावरील प्रदानाची मागणी करता येईल आणि या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतूदी, शक्य असेल तेथवर, ज्या वर्षात कराची किंवा फीचा संबंध येतो, त्या वर्षात अशी आकारणी करण्यात आली होती असे समजून लागू करण्यात येईल''.**

त्यानुसार पुणे शहरातील ज्या मिळकतींची आकारणी करून घेतली नाही अशा मिळकतधारकांना कायदेशीर कागदपत्रे सादर करून अर्ज केल्यास वरील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षातील वाजवी भाड्याच्या दराने कर आकरणी करण्यात येईल. मात्र बांधकाम पूर्णत्वाच्या दाखल्यानुसार ज्यांची कर आकरणी झाली असेल त्यांनी पुन्हा अर्ज दाखल करणे आवश्यक राहणार नाही.

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ कमल **२६७ अ** अन्वये ज्या मिळकतींची कर आकारणी केलेली आहे व त्यांना दुपटी इतकी शास्ती आकारण्यात आलेली आहे, अशा मिळकतधारकांकडून त्यांची मिळकत सन २००५-२००६ पासून ज्या आर्थिक वर्षात तयार झालेली असल्यास त्यांनी आवश्यक ती कायदेशीर कागदपत्रे दाखल करावीत.

तरी या जाहीर प्रकटनाव्दारे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतधारकांना असे अवाहन करण्यात येते की, ज्यांची मिळकतकर आकारणी वरील कायद्यातील कलम **२६७ अ** प्रमाणे अनाधिकृत बांधकाम म्हणून झालेले असल्याने दुपटी इतकी कराची शास्तीसह मिळकतकर आकारले जात असल्यास, मात्र अशा मिळकतीचा वापर माहे जानेवारी २००८ पूर्वीपासून होत असल्यास व त्याबाबतची आवश्यक ते कागदपत्रे उदा. महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी (MSEDCL) ची बीले, दूरध्वनीची बिले, इत्यादी पुराव्यांसह दि. ३१/३/२०१२ पूर्वी कर आकारणी व कर संकलन खात्याकडे अर्ज दाखल करावा. जेणेकरून त्यांची दुपटी इतक्या कराची शास्ती रद्द करता येईल. त्याचप्रमाणे ज्यांच्या मिळकतींची कर आकारणी अद्यापही झालेली नसल्यास मात्र अशा मिळकतींचा वापर माहे जानेवारी २००८ पूर्वी पासून असलेल्या मिळकतीधारकांनी योग्य त्या पुराव्यासह अर्ज केल्यास त्यांचीही आकारणी दुपटी इतक्या कराची शास्ती न लावता सर्वसाधारण (Normal) पद्धतीने करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**महापालिका आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**

## १९) **युएलसी (कमाल जमीन धारणा) अंतर्गत वितरीत सदनिकांचे कराबाबत.**

महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.शासन निर्णय क्रमांक : युएलसी २२/२००६/६८२/नाजकधा–२,दिनांक : १७ जून, २००६ अन्वये नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या कलम २० व २१ खालील गृहबांधणी योजनेतून शासन देय सदनिकेचा ताबा विकसकाने शासनाच्या ताब्यात दिल्यापासून या सदनिकेचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेईपर्यंतच्या (करारानामा नोंदणीकृत होईपर्यंत) कालावधीसाठी या सदनिकेबाबत संबंधित महानगरपालिकेने मालमत्ता कर व अन्य कर आकारणी करू नये. सदर सदनिकेचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेतल्यापासून या सदनिकेसाठी महानगरपालिकेने मालमत्ता कराची आकारणी करणेबाबत झालेल्या निर्णयानुसार पुणे महानगरपालिकेने कार्यवाही केली आहे. **वितरित करण्यात आलेल्या सदनिकेचाताबा लाभार्थ्यांनी प्रत्यक्ष घेतल्यानंतर महानगरपालिकेकडून मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक : युएलसी २२/२००६/६८२/नाजकधा–२
दिनांक : १७ जून, २००६.

**प्रस्तावना :–**

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वेच्छाधिकारातून कलम २०/२१ खालील गृहबांधणी योजनेतून शासनास प्राप्त झालेल्या सदनिकेचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात येते. गृहबांधणी योजनेतून शासन देय सदनिकेचा ताबा विकसकाने शासनाच्या ताब्यात दिल्यानंतर या सदनिकांचे वितरण लाभार्थ्यांना करण्यात येते. विकसकाने शासन देय सदनिकेचा ताबा शासनाकडे दिल्यानंतर या सदनिकेचे वितरण लाभार्थ्यांना होवून सदनिकेचा प्रत्यक्ष ताबा घेणे यामध्ये बराच कालावधी जातो. तसेच लाभार्थ्यांने सदनिकेचा ताबा न घेतल्यास या सदनिकेचे पुर्नवितरण करण्यात येते. त्यामुळे शासनाच्या ताब्यात सदनिका येणे व त्याचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेणे यामध्ये काही महिने/वर्षे असा कालावधी जातो. ज्यावेळेस लाभार्थी सदनिकेचा ताबा घेण्यासाठी जातो त्यावेळेस लाभार्थ्याकडून या सदनिकेची थकीत मालमत्ता कराची मागणी करण्यात येते. तथापि, थकित मालमत्ता कराची थकबाकी भरण्यास लाभार्थी तयार होत नाही. सदनिका ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून या सदनिकेसाठी मालमत्ता कर भरण्याची लाभार्थ्यांची तयारी असते. तसेच या सदनिका शासनाच्या ताब्यात दिलेल्या असल्यामुळे विकसकदेखील या सदनिकेचा मालमत्ता कर भरण्यास तयार नसतात. अशा परिस्थितीत शासनाच्या ताब्यातील सदनिकेच्या मालमत्ता कराचा भरणा करण्याबाबतचा प्रश्न निकाली काढण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**निर्णय :–**

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या कलम २० व २१ खालील गृहबांधणी योजनेतून शासन देय सदनिकेचा ताबा विकसकाने शासनाच्या ताब्यात दिल्यापासून या सदनिकेचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेईपर्यंतच्या (करारानामा नोंदणीकृत होईपर्यंत) कालावधीसाठी या सदनिकेबाबत संबंधित महानगरपालिकेने मालमत्ता कर व अन्य कर आकारणी करू नये. सदर सदनिकेचा ताबा शासन नामनिर्देशित व्यक्तीने घेतल्यापासून या सदनिकेसाठी महानगरपालिकेने मालमत्ता कराची आकारणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

वरील शासन निर्णयानुसार ज्या मिळकतदारांकडून अर्ज येतील त्यांचे बाबत पुणे महानगरपालिकेने कार्यवाही पूर्ण करण्यात येते.

**२०) पुणे शहरातील मोबाईल कंपन्याच्या कर आकारणीबाबत मा. महापालिका आयुक्त यांनी खालील बाबी विचारात घेऊन ठराव क्रं. ६/४१३दि. ४.२.२००८ अन्वये मान्यता .**

पुणे शहरातील ज्या निवासी, बिगरनिवासी व मोकळया जागा आहेत, त्यांची प्रचलित धोरणानूसार कर आकारणी करण्यात येते. पुणे शहरात विविध मोबाईल कंपन्यांचे टॉवर्स असून, अशा अनेक मोबाईल टॉवर्सची कर आकारणी अद्यापही करण्यात आलेली नाही. मोबाईल टॉवर्सची आकारणी करणेबाबत मा. विधी सल्लागार विभागाचा कायदेशीर अभिप्राय घेण्यात येऊन तत्कालीन करआकारणी व करसंकलन प्रमुख यांनी विविध मोबाईल कंपन्यांच्या प्रतिनिधींची दि. १४.१२.२००७, दि. १८.०१.२००८ व दि. ३०.०१.२००८ रोजी बैठक आयोजित करून बैठकीमध्ये मोबाईल टॉवर्सच्या कर आकारणी पध्दतीबाबत करावयाच्या धोरणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. त्यावेळी संबंधित मोबाईल कंपन्यांच्या प्रतिनिधींना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित पध्दतीनूसार पुणे शहरातील मोबाईल टॉवर्सची कर आकारणी करणेबाबत विनंती केल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेनेकडून त्यांचेकडे मो. टावरच्या करआकारणीची माहिती घेण्यात आली असून ती खालीलप्रमाणे.

१) संबंधित टॉवर कंपनीने जागा मालकाशी झालेले करारातील भाडे विचारात घेवून वार्षिक भाडे ठरविण्यात येते.
२) वरील वार्षिक भाडयातून ३०%सेवाशुल्क म्हणून वजावट करण्यात येते.
३) ३०% वजावटीनंतर राहिलेल्या रकमेतून १०% स्टॅण्डर्ड डिडक्शन म्हणून रक्कम कपात करण्यात येते.
४) वरील वजावटीनंतर शिल्लक राहिलेली ही रक्कम वार्षिक करपात्र रक्कम म्हणून निश्चित करण्यात येते. वार्षिक करपात्र रकमेवर मुख्य सभेने मान्यता दिलेल्या कराच्या दराने आकारणी करण्यात येते. परंतु पाणीपटट्री व सफाईपटट्री या कराची आकारणी करण्यात येत नाही.
५) सदर करपात्र रकमेवर संबंधित मनपाच्या मुख्यसभेच्या मान्य कराच्या दराने आकारणी केली जाते.

पिंपरी–चिंचवड मनपामध्ये एकूण वार्षिक भाडयातून १०% देखभाल दुरूस्तीसाठी वजा करुन वार्षिक करपात्र रक्कम ठरविण्यात येते. वार्षिक करपात्र रकमेवर पाणीपटट्री, सफाईपटट्री वजा करुन इतर करांची आकारणी करण्यात येते.

पुणे शहरातील विविध ठिकाणी असलेल्या मोबाईल टॉवर्स कंपनीचे प्रतिनिधींची तीन वेळा तत्कालीन करआकारणी व करसंकलन प्रमुख यांनी समक्ष बैठक घेवून सविस्तर चर्चा करून चर्चेतील मुद्दयांचा खुलासा करण्यात येऊन पुणे शहरातील मोबाईल टावरर्सची करआकारणीस खालीलप्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे.

१) संबंधित मोबाईल टॉवर कंपनीने जागा मालकांशी झालेले करारातील भाडे विचारात घेवून वार्षिक भाडे ठरविण्यात यावे. (मासिक भाडे द १२ महिने)
२) पुणे मनपाच्या मान्य धोरणानूसार वरीन वार्षिक भाडयातून १५% देखभाल दुरुस्तीकरींता रक्कम वजावट करण्यात यावी.
३) वरील वजावटीनंतर शिल्लक राहिलेली रक्कम ही मोबाईल टॉवर्सची (टॉवर + सर्व्हीस रुम) वार्षिक करपात्र रक्कम समजण्यात यावी.
४) ज्या महिन्याला भाडे करार केला, त्यानंतर दोन ते तीन महिन्यात प्रत्यक्ष वापर सुरु होत असल्याने भाडे कराराचा महिना व अन्य दोन महिने सोडून नंतरच्या महिन्याच्या पहिल्या तारखेपासून अशी आकारणी पूर्वलक्षी प्रभावाने करणेत यावी.

५) जे मोबाईल टॉवर्स स्वतःच्या मालकीचे असतील त्यांची कर आकारणी त्या विभागात इतर टॉवर्सनी त्यांच्या टॉवर्सच्या बांधकामाच्या प्रमाणात जेवढे भाडे दिले असतील ते भाडे व टॉवर्स बांधकाम विचारात घेवून करण्यात यावी.

६) वार्षिक करपात्र रकमेवर मा. मुख्य सभेने मान्यता दिलेल्या कराच्या दराने पुर्वी **(सर्वसाधारण कर १४, २१, ३०, ३८% स्लॅबप्रमाणे, अग्निशामक कर १.२५%, वृक्ष कर १%, पथ कर ५%) आकारणी करण्यात येते**. **मात्र टॉवर्सना पाणीपुरवठा व साफसफाई होत नसल्याने पाणीपटट्टी, सफाईपटट्टी १६% जललाभकर ३% व जलनिस्सारण लाभकर ६% या कराची कराची आकारणी करण्यात येत नाही.** महाराष्ट्र शासनाकडील शिक्षण कर व रोजगार हमी उपकराची आकारणी करण्यात येते.

७) सन २०१० पासून मोबाईल टॉवर्सना मा.मुख्यसभेच्या मान्यतेने सरसकट ११५% दराने कर आकारणी करण्यात येते.

८) मोबाईल टॉवर्सच्या करआकारणी, करसंकलन व कोर्टातील केसेस इ. संदर्भात मे. जयंत इलेक्ट्रीकल्स इया संस्थेस निविदाव्दारे कामकाज करणेबाबत नेमणूक केलेली आहे.

**२१) पुणे मनपा हद्दवाढीतील मिळकतींबाबत.**

(१) मुंबई प्रांतिक महापालिका अधिनिमय १९४९ चे कलम १२९ अन्वये जिल्हा परिषदेच्या क्षेत्राचा शहरात समावेश करण्यात येईल, तेव्हा तात्पूरती तरतूद या कलमांतर्गत व प्रयोजनासाठी पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गांवातील मिळक़तींची आकारणी पुणे म.न.पा. मुख्य सभा ठराव क्र.५८१, दि.१२.२.१९९९ अन्वये करण्यात आलेली आहे.

(२) पुणे म.न.पा.हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या गांवामध्ये पुणे म.न.पा.कडून जास्त प्रमाणात मिळकतकर आकारण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी काही लोकप्रतिनिधी/सामाजिक संस्थांनी केल्या होत्या. त्यानुसार तात्कालीन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.१८.११.२००२ रोजी जिल्यातील लोकप्रतिनिधींची बैठक होऊन तक्रारींच्या अनुषंगाने समाविष्ट गांवातील करआकारणीबाबत पूर्नविचार करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

(३) त्यानुसार म.न.पा.मुख्य सभा ठराव क्र.४२८, दि.२०.१०.२००३ ने पुणे म.न.पा.मध्ये समाविष्ट झालेल्या गांवातील ग्रामपंचायतीकडे नोंदणी झालेल्या मिळक़तींच्या करआकारणीबाबत ''ज्या सालचे घर, त्या सालचा दर'' अशा पध्दतीने धोरण निश्चित करण्यात आले. (ठरावाची सत्यप्रत प्रकरणी समाविष्ट केली आहे.)

(४) ''ज्या सालचे घर, त्या सालचा दर'' या ठरावाची कार्यवाही करणेकामी संबधीत खाते अधिकाऱ्यांची अभ्यास समिती नेमून बांधकामाचा प्रकारानुसार म.न.पा.च्या सन १९७० पूर्वी ते १९९० पर्यंतच्या वाजवी भाडयाच्या दरांच्या अनुषंगाने एकूण पाच गट करुन वाजवी भाडयाचे दराचे विभागणी करण्यात आली.

त्यानुसार मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १२९अ नुसार म.न.पा. हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या मिळक़तींची केलेली तात्पूरती आकारणी प्रक्रिया पूर्ण झालेली असल्याने व म.न.पा. मुख्य सभा ठराव क्र.४२८, दि.२०.१०.२००३ प्रमाणे ''ज्या सालचे घर, त्या सालचा दर'' या धोरणानुसार निश्चित केली आहे. (कार्यालयीन कार्यवाहीची प्रत समाविष्ट केलेली आहे)

**माध्यमिक शाळा व उच्च शिक्षण संस्था या मिळकतीच्या करआकारणी बाबत.**

मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/४६,दि.३०/०४/२००८.

**पुणे मनपा हद्दीतील वर्कशॉप व पेट्रोल पंपाच्या करआकारणीबाबत**

महापालिका ठ.क्र.८/६३०,दि.२३/११/२०१०

वर्कशॉपची करआकारणी बिगरनिवासी दराने करणेबाबत व पेट्रोलपंपाची करआकारणी जमीनी अंतर्गत असणाऱ्या टाक्यांची तेल व्यवसायीक कंपन्यांनी कळविलेल्या पत्रामध्ये नमुद केलेला

बांधाकामाचा खर्च शासन मान्यताप्राप्त मुल्यनिर्धारिक सटीफिकेटस विचारात घेवून त्यावर ९% दराने बिगरनिवासी वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेस व पेट्रोलपंपाच्या आवारातील मोकळ्या जागेची करआकारणी बिगरनिवासी दराने करण्यास व ज्या जागेत पेट्रोल कार्यालय व अन्य मिळकत आहे अशांची करआकारणी बिगरनिवासी वाजवी दराने निश्चित करण्यात यावी.

## २२) पोहोण्याचे तलावाची करआकारणी

### महापालिका आयुक्त ठ.क्र.६/६९० ,दि.१२/११/२००८.

पुणे शहरातील सहकारी गृहरचनामध्ये केवळ सोसायटीच्या सभासादासाठी पोहण्याचा तलाव वापरात असेल तर अशा पोहण्याच्या तलावाची करआकारणी क्षेत्रफळावर म्हणजेच लांबी x रुंदी विचारात घेवून निवासी दराने करण्यात यावी. अन्य कमर्शियल पोहण्याच्या तलावाची करआकारणी बिगरनिवासी दराने करण्यात यावी.

## २३) पूरग्रस्त वसाहतीच्या मिळकत करआकारणी बाबत.

**महापालिका आयुक्त ठ.क्र.३/९७३,दि.०८/१०/१९९२.**

**मा.महापालिका आयुक्त ठ.क्र.६/४६४,दि.१/६/१९८८ अन्वये पूरगस्त मिळकतीचे विभक्तीकरणा नंतरची करपात्र र.रु.५० अथवा रु.१०० (पूरग्रस्त घरे)**
**ज्या मिळकती भाडे कराराने दिलेल्या आहे त्यांची भाडे रकमेच्या उत्पन्नाच्या प्रमाणात करआकारणी करण्यात यावी.**

## २४) पुणे शहरातील राज्य शासन व केंद्र शासन तसेच निमशासकीय राज्य शासनाची कार्यालये (स्वत:च्या मालकीची) यांची करआकारणी बाबत.

१) <u>राज्य शासन.</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९१९ कलम १३३(१) अन्वये राज्य शासनाच्या इमारतीकडून मिळकतकर घेणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार पुणे शहरातील राज्य शासनाच्या मिळकतीच्या करआकारणीबाबत माहिती खालीलप्रमाणे.

राज्य शासनाच्या करआकारणी झालेल्या २८० इतक्या मिळकतीची नोंद आहे.

राज्य शासनाच्या इमारतीची करआकारणी बांधकाम खर्चाच्या ९% दराने वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करून त्यावर खालीलप्रमाणे कर आकारण्यात येतात.

| अ.क्र. | तपशील | कराचे दर |
|---|---|---|
| 1) | सर्वसाधारण पट्टी | वार्षिक करपात्र रक्कम 16.75%, 23.75%, 32.75%, 40.75% प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या ८०% (मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम 1949 कलम 133 अन्वये) |
| 2) | पाणीपट्टी | वार्षिक करपात्र रकमेच्या टप्प्याप्रमाणे |
| 3) | सफाई पट्टी | वार्षिक करपात्र रक्कम 20.50% प्रमाणे |
| 4) | फायरसेस | वार्षिक करपात्र रक्कम 1.50% प्रमाणे |
| 5) | ट्रीसेस | वार्षिक करपात्र रक्कम 1% प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| 6) | जललाभकर | वार्षिक करपात्र रक्कम 5.75% प्रमाणे |
| 7) | जलनि:स्सारण कर | वार्षिक करपात्र रक्कम 9.50% प्रमाणे |
| 8) | पथकर | वार्षिक करपात्र रक्कम 10% प्रमाणे |
| 9) | मनपा शिक्षण उपकर | वार्षिक करपात्र रक्कम 1.75% प्रमाणे |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 133(2) अन्वये राज्य शासनाच्या इमारतीवरील मिळकतकर आकारणी बाबत महापालिकेच्या सहमतीने राज्य शासनाच्या मान्यतेने विशेष अधिकाऱ्यांच्या नेमणूकीबाबत असलेल्या तरतूदीनुसार मे. राज्य शासनाकडून वेळेत आदेश प्राप्त होत नसल्याने राज्य व केंद्र सरकारच्या मिळकतीवरील दर पाच वर्षांने करण्यात येणारी करआकारणी त्या त्या कालावधीत होत नसल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होत नाही. यासाठी करआकारणी व करसंकलन प्रमुख यांचेमार्फतच सदर राज्य व केंद्र शासनाच्या इमारतींची करआकारणी दर पाच वर्षांने करणेबाबतची बाब मा. मुख्यसभेच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करीत असल्याबाबतची माहिती मे. शासनाकडे कळविणेबाबतचे विषयपत्र सादर केले असून मा.विधी ,मा. स्थायी समितीची मान्यता मिळाली आहे. यापूर्वी शासनाची मंजूरी 2005 पूर्वी मिळाली असून 2005 ते 2010 या पाच वर्षासाठी मंजूरीसाठी प्रस्ताव 2008 मध्ये पाठविण्यात आला असून अदयाप मंजरी मिळाली नसल्याने 2005 ते 2010 या कालावधीत पुणे शहरात नव्याने तयार झालेल्या राज्य व केंद्र सरकारच्या इमारतींची करआकारणी झाली नाही.

मा.मुख्यसभा ठ.क्र.395,दि.25/10/2012 अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 कलम 133(2) मध्ये ‘‘ राज्य शासनाकडून सामान्य कर वसूल केला असता त्यांचे करयोग्य मूल्य शासन महापालिकेच्या सहमतीने याबाबत वेळोवेळी नेमील अशा व्यक्तीकडून निश्चित केले पाहिजे.’’ अशी तरतूद असल्याने करआकारणी व करसंकलन प्रमुख या पदाचा पदभार असणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत मिळकतींची करआकारणी केल्यास त्या त्या आर्थिक वर्षात केंद्र व राज्य शासनाच्या नव्याने तयार झालेल्या मिळकतींची करआकारणी अनुक्रमे मिनिस्ट्री ऑफ फायनान्स गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांचे पत्र क्र. 14(1)पी/2/1 दिनांक 10 मे 1954 ,पत्र क्र. 4(7) /वी65 दि.29.3.1967 व महाराष्ट्र मनपा अधिनियम 1949 कलम 133 मध्ये नमूद केल्याप्रमाणे करता येईल व त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ असल्याने विशेष अधिकाऱ्यांस देण्यात येणाऱ्या मुशाहिराच्या रकमेची बचत होवून मनपाचा फायदा होणार असल्याने पुणे शहरातील केंद्र व राज्य शासनाच्या नव्याने तयार होणाऱ्या मिळकतींची करआकारणी करआकारणी व करसंकलन प्रमुख पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी करणेबाबत मंजूरी मिळाली असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या निदर्शनास आणलेला असून खात्याचे पत्र टीजीओ/2676,दि.19/08/2015 अन्वये महाराष्ट्र मनपा अधिनियम 1949 कलम 133 नुसार विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करणेबाबत प्रयत्न चालू असून ही प्रक्रीया करुन घेणेसाठी वेळ लागणार असल्याने शासकीय मिळकतींची करआकारणी वेळेत करता यावी म्हणून करआकारणी व करसंकलन पदाचा पदभार असलेले अधिकारी पुणे मनपाच्या हद्दीतील शासनाच्या तयार होणाऱ्या मिळकतींची करआकारणी करणेबाबत मंजूरी मिळाली असल्यामुळे त्यांचेकडून शासनाच्या मिळकतीची करआकारणी करण्यात येत आहे.

## २) <u>केंद्र शासन.</u>

केंद्र शासनाच्या करआकारणी झालेल्या ९० इतक्या मिळकतीची नोंद आहे.

मिनिस्ट्री ऑफ फायनान्स गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांचे पत्र क्र. १४(१) पी/२/१ दि. १०/०५/१९५४ मध्ये नमुद केले असून पत्र क्र. ४(७)/वी ६५, दि. २९/०३/१९६७ अन्वये सेवाशुल्काची आकारणी करण्यात येते. भारतीय राज्य

घटना कलम २८५ मध्ये केंद्रशासनाच्या मिळकतीवर कर घेणेबाबत तरतूद नसल्याने केवळ सेवाशूल्क आकारण्यात येते, पुणे शहरातील केंद्र शासनाच्या करआकारणी झालेल्या मिळकतीबाबत माहिती खालीलप्रमाणे.

केंद्र शासनाच्या इमारतीची करआकारणी बांधकाम खर्चाच्या ९% दराने वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करून त्यावर खालीलप्रमाणे कर आकारण्यात येतात.

| अ.क्र. | तपशील | कराचे दर |
|---|---|---|
| 1) | सर्वसाधारण पट्टी | वार्षिक करपात्र रक्कम सर्व साधाररण कर टक्केवारी प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या 75 % |
| | | |
| 2) | सफाई पट्टी | वार्षिक करपात्र रक्कम सफाईकर टक्केवारी प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या 75% |
| 3) | फायरसेस | वार्षिक करपात्र रक्कम अग्निशामक कर टक्केवारी प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या 75% |
| 4) | ट्रीसेस | वार्षिक करपात्र रक्कम वृक्ष कर टक्केवारी प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या 75% |
| 5) | जललाभकर | वार्षिक करपात्र रक्कम जललाभ कर टक्केवारी प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या 75% |
| 6) | जलनि:स्सारण कर | वार्षिक करपात्र रक्कम जलनि:सारण लाभ कर टक्केवारी प्रमाणे येणाऱ्या रकमेच्या 75% |

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत केंद्र शासनाच्या अधिकारात येत असलेल्या सुमारे ८५ मिळकती आहेत. या कार्यालयांच्या इमारतींना सर्वसाधारण करासह अन्य सर्व्हिस चार्जेस घेणेबाबत मिनिस्ट्री ऑफ फायनान्स गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांचे पत्र क्र. १४(१) पी/२/१ दि. १०/०५/१९५४ मध्ये नमुद केले असून पत्र क्र. ४(७)/वी ६५, दि. २९/०३/१९६७ अन्वये सेवाशुल्काची आकारणी करण्यात येऊन एकूण कराच्या ७५%, ५०% किंवा ३३.३३% दराने बिले देण्याची तरतूद आहे. त्यानुसार एकूण कराच्या ७५% व ५०% प्रमाणे बिले पाठविली जातात.

केंद्र शासनाची काही कार्यालये उदा. सेंट्रल एक्साईज, इनकम टॅक्स, रेल्वे, ई.भारतीय राज्य घटनेच्या Article २८५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर न भरण्याची भूमिका घेऊन पत्रव्यवहार करीत होते. तदनंतर मे. सर्वोच्च न्यायालय सिव्हील अपिल नं.९४५८ ते ९४६३/२००३ याबाबत दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनीस्ट्री ऑफ अर्बन डेव्हलपमेंट यांनी कार्यालयीन परिपत्रक ११०२५/२६/२००३/युसीडी, दि. १७/१२/२००९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे “ सर्व्हिस चार्जेस” आदा करण्यासाठी संबंधित कार्यालयाबरोबर करावयाच्या करारनामाच्या निर्णयाच्या अनुषंगाने योग्य ते करारनामे तयार करून संबंधित केंद्रशासनाच्या कार्यालयास पाठविण्यात आले आहेत. त्यानुसार करानामा करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येत आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या भांडवली मुल्याच्या / एकूण बांधकाम खर्चाच्या ९% इतकी रक्कम मोठी येत असल्याने त्यांचेकडून त्यावर आकारण्यात येणारा मिळकतकर हा सुमारे ३ ते ४ वर्षामध्ये त्या इमारतीच्या बांधकाम खर्चाएवढी होत

असल्याने केंद्र व राज्य शासनाच्या इमारतीची करआकारणी क्षेत्रफळावर करणेबाबत प्रस्ताव महापालिका आयुक्त यांचेकडे सन २०१५ मध्ये सादर केला आहे. अद्याप मंजूरी मिळालेली नाही.

**<u>७.</u>** पुणे शहर व समाविष्ट गावतील मिळकतींचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्वेक्षण करणे तद्नंतर सर्वेक्षणानुसार त्या मिळकतींचे नकाशे (mapping) तयार करून त्या मिळकतीची भौगोलीक माहिती (Geographical information system) म.न.पा. च्या मुख्यडेटाबेसवर लिंक करणे बाबत स्थायी समिती ठराव क्र. ९५ दि. १९.४.२००५.अन्वये वर्कऑर्डर क्र. जा.क्र. टी.जी.ओ./२०९ दि. ९.५.२००५ अन्वये प्रति मिळकत १४.५० पैसे प्रमाणे मे वेकफिल्ड नेमोनिक्स या संस्थेस रक्कम रू.१,४०,००,०००/–पर्यंत काम करणेबाबत सोपविण्यात आले असून त्यांनी आज अखेर मिळकतीच्या सर्वेक्षणाबाबत सुमारे ४,१४,००० मिळकतींचे सर्वेक्षण केले. यामध्ये झोपडी, झाडे,विद्यूत पोल,कचरापेटी,स्टॉल इत्यादींचा समावेश आहे. १२१२ मिळकती आकारणी न झालेल्या व १४६० मिळकती वापरात बदल झालेल्या तसेच १,१८,३२९ मिळकतींचे मॅपिंग पूर्ण केले आहे. ४ लाख १४ हजार मिळकतींचे सर्वेक्षण केले असून त्यापैकी सुमारे १,७५,११० मिळकती जी.आय.एस.लिंकेजसाठी तयार आसल्याचे सदर संस्थेने म.न.पा. स कळविले आहे.

वरीलबाबत पुणे शहरातील मिळकतीचे जीआयएस करणेबाबत सन २०१६ मध्ये नव्याने प्रक्रीया सुरु करण्यात आलेली आहे.

# २५) मिळकतकर आकारणीबाबत घेण्यात आलेले धोरणात्मक निर्णय

| अ.क्र | तपशील | महापालिका आयुक्त ठराव क्र. | कार्यालय परिपत्रक क्रमांक | मान्यतेबाबत थोडक्यात माहिती |
|---|---|---|---|---|
| | मालक स्वत: राहण्यासाठी जागेचा वापर करीत असल्यास | मुख्य सभा ठराव क्र. ५, दिनांक ०३/०४/१९७० | | शेड्यूल चॅप्टर ८ मधील नियम क्र. ७ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्त्या सुचविण्यात आल्या आहेत.<br>(१) करपात्र रक्कम ठरविताना १० ऐवजी १५ टक्के सूट द्यावी.<br>(२) घरमालक स्वत: राहत असलेल्या जागेचे भाडेवाजवी भाड्याच्या ६०% इतके धरावे. (कलम २(४५) मालक यांची जी व्याख्या दिली आहे त्यामध्ये जे बसतील त्यांनाच ही सवलत दिली जावी.) |
| | भाड्याने दिलेल्या निवासी मिळकती | ६/१८३, दिनांक २१/०९/२००० | मआ/टीजीअशे १४९६, दि. २१/०९/२००० | पुणे शहरातील ज्या निवासी इमारती/सदनिका निवासी भाड्याने दिलेल्या आहेत अशा इमारती/सदनिकांची करपात्र रक्कम ठरविताना सध्या प्रचलित असलेल्या वाजवी भाड्याच्या दुप्पट दराने कर आकारणी करावी. अशा इमारती/सदनिकांना ४०% सवलत देण्यात येऊ नये. सदर धोरणाची अंमलबजावणी दिनांक ०१/१०/२००० पासून करण्यात यावी. यापूर्वी ज्या इमारती/सदनिकांची करपात्र रक्कम प्रत्यक्ष मिळणाऱ्या भाडे रकमेवर करण्यात आली असे अशा इमारती/सदनिकांच्या कर आकारणीबाबत हे धोरण लागू होणार नाही. |
| ३. | भाड्याने दिलेल्या बिगरनिवासी मिळकती | ६/२३८, दिनांक २७/११/२००० | मआ/टीजीओ/२०७४, दिनांक २७/११/२००० | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील भाड्याने दिलेल्या बिगरनिवासी मिळकतींची कर आकारणी घरमालकास भाडेकरूंकडून प्रत्यक्ष मिळणाऱ्या भाड्यावर न करता प्रति चौ. फुटास रू. ५.२० प्रमाणे दर धरण्यात यावा व सदर धोरणाची अंमलबजावणी दिनांक ०१/०४/२००१ पासून कारवी.<br>याबाबतीत माहे डिसेंबर २००० ते दि. ३०/०४/२००१ अखेर ॲम्नेस्टी स्कीम राबवून सदर कालावधीत आलेल्या अर्जाच्या मिळकतींची कर आकारणीवरील धोरणाप्रमाणे करण्यात यावी.<br>२००५ पासून भाडयाने दिलेल्या बिगरनिवासी मिळकतींची करआकारणी भाडयावर न करता बिगरनिवासी दराने करण्यात येत आहे |
| ५. | मोकळ्या जागांची कर आकारणी (ॲम्नेस्टि स्कीम) | ६/३०५, दिनांक २०/०१/२००१ | मआ/टीजीओ/२६९६, दिनांक १९/०१/२००१ | पुणे शहरातील व हद्द वाढीतील ज्या मोकळ्या जागांची कर आकारणी झाली नसेल अशा मोकळ्या जागांच्या मिळकतदारांनी ॲम्नेस्टी स्कीममध्ये (दि. ०१/०१/२००१ ते दि. ३०/०४/२००१) अर्ज केल्यास अशा मोकळ्या जागांची करआकारणी खालीलप्रमाणे करण्यात यावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | (१) पुणे शहरातील मोकळ्या जागांची कर आकारणी करताना : मोकळ्या जमिनीची करपात्र रक्कम = मोकळ्या जमिनीचे क्षेत्रफळ रू. २.५० (प्रति चौ. मीटर) = करपात्र रक्कम.<br>(२) पुणे शहरात समावेश झालेल्या ३८ गावांतील मोकळ्या जमिनी/भूखंडाची कर आकारणी : मोकळ्या जमिनीची करपात्र रक्कम = मोकळ्या जमिनीचे क्षेत्रफळ रू. ०.५० (प्रती चौ. मीटर) करपात्र रक्कम. |
| ७. | विकसनकर्त्यांच्या नावावरील फ्लॅट नवीन खरेदीदाराने त्यांच्या नावावर केल्यानंतर करपात्र रकमेमध्ये ४०% सवलत देणेबाबत. | ६/१४०, दिनांक २३/०८/२००० | मआ/टीजीओ/१२८७, दिनांक ३१/०८/२००० | मनपा अधिनियमातील कलम २० मधील तरतुदी विचारात घेऊन .....<br>(१) जे खरेदीदार विकसनकर्त्याकडून फ्लॅट खरेदी करतील व मनपाच्या रजिस्टरी त्यांच्या नावाची नोंद करून घेतील अशा मिळकतदारास ज्या दिनांकास त्याने अर्ज केला आहे त्या सहामाहीपर्यंत कराची संपूर्ण रक्कम भरून घेऊन त्यांच्या पुढील सहामाहीपासून करयोग्य मूल्यात ४०% सवलत देऊन करयोग्य मूल्याची फेरनिश्चिती करण्यात यावी.<br>(२) खात्याकडे प्रलंबित असलेल्या अशा अर्जाचे बाबतीत अर्ज केलेल्या सहामाहीचा कर वसूल करून त्यांचे नाव आकारणी रजिस्टरी दाखल करून प्रस्तूत मिळकतीचा वापर मालक स्वत: राहण्यासाठी करीत असेल तर अशा बाबतीत अर्ज केलेल्या दिनांकाच्या पुढील सहामाहीपासून करयोग्य मूल्यात ४०% सवलत देऊन करपात्र रक्कम फेरनिश्चित करण्यात यावी. |
| ८. | एकाच इमारतीमधील दोन समान क्षेत्रफळ असलेल्या दोन फ्लॅटच्या कर आकारणीमध्ये तफावत | | मआ/टीजीओ/३३३५, दिनांक २१/१२/१९९९ | काही वेळेस एखाद्या मिळकतीमधील फ्लॅटची प्रथम आकारणी करताना फ्लॅटचा वापर मालक न करता भाडेकरी करीत असल्याचे तपासणीत आढळल्याने भाड्याच्या रकमेवर कर आकारणी केली जाते. मालक सदर फ्लॅटचा वापर राहण्यासाठी सुरू करतो त्यावेळी फ्लॅटची फेर कर आकारणी करणेबाबतची प्रथा पूर्वीपासून होती. महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/६५८, दिनांक २२/११/१९९६ नुसार ही पद्धत बंद करण्यात आली. अजूनही वरील पद्धतीमुळे एकाच इमारतीमधील फ्लॅटच्या आकारणीमध्ये विसंगती आहे. याबाबत फ्लॅटधारकांकडून तक्रार आल्यास त्या फ्लॅटची आकारणी इमारतीमधील अन्य फ्लॅटबरोबर करण्याची कार्यवाही यापुढे खात्याने विनाविलंब करावी.<br>फ्लॅट धारकांकडून भाडेकरी जागा खाली करून गेल्याने कर आकारणी कमी करणेबाबत त्या वर्षामध्ये ज्या महिन्यात अर्ज दाखल केला असेल त्या सहामाहीच्या मिळकतकराची पूर्ण रक्कम भरून घेऊन फ्लॅट धारक फ्लॅटचा वापर स्वत:च्या राहण्यासाठी करीत असल्यास पूर्वीची करपात्र रक्कम कायम करण्यात यावी. मात्र फ्लॅटधारक फ्लॅटचा वापर स्वत: राहण्यासाठी करीत नसल्यास कर आकारणी करताना ४०% सवलत देऊ नये.<br>तसेच मूळ करपात्र रक्कम निश्चित करताना ती प्रत्यक्ष भाड्यावर निश्चित करण्यात आली असेल आणि एखाद्या इमारतीमधील सर्व फ्लॅटस्ची आकारणी याच पद्धतीने झाली असेल अशा वेळी फ्लॅटधारक फ्लॅटचा वापर स्वत:च्या राहण्यासाठी करीत असेल तर ज्या आर्थिक वर्षात त्या फ्लॅटची कर आकारणी झाली असेल त्या आर्थिक वर्षातील वाजवी भाड्याचा दर विचारात घेऊन भाड्यावर ४०% सवलत देऊन आकारणी निश्चित करण्यात यावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | हॉटेल, हॉस्पीटलमधील कॉमन पॅसेज जनरेटर रूम, एसी प्लॉट रूम, सर्व्हिस रूमची कर आकारणी व बि. निवासी इमारतीमधील लॉप्टची कर आकारणी न करणे. | ६/२८१, दिनांक ०३/०१/२००१ | | (१) हॉटेल, हॉस्पिटल्स् या मिळकतीमधील कॉमन पॅसेजची कर आकारणी त्या त्या मिळकतीच्या विभागामधील निवासी दराने करणेस सदर मिळकतीमधील सर्व्हिस–रूम, एसी प्लॉटरूम, जनरेटर रूमची कर आकारणी र.रू. ०.५० प्रती चौ. फूट दराने करण्यास.<br>(२) बिगरनिवासी इमारतीमधील पाच फूट उंची असलेल्या लॉप्टची कर आकारणी सदर जागेचा वापर सामान ठेवण्याशिवाय अन्य कारणांसाठी होत नसल्यास ती करण्यात येऊ नये.<br><br>टीप /मा.महापालिका आयुक्त ठराव क्रं.६/२६६ दिनांक ४.११.२०१५ अन्वये सर्व बिगरनिवासी मिळकतीमधील कॉमन पॅसेजची करआकारणी निवासी दराने करणेबाबत तसेच बिगरनिवासी इमारतीमधील ५ पाच फूट उंची असलेल्या लॉप्टची कर आकारणी सदर जागेचा वापर सामान ठेवण्याशिवाय अन्य कारणांसाठी होत नसल्यास ती न करणेबाबत व ५ फूटापेक्षा अधिक उंची लॉप्टची असल्यास त्यांची निवासी दराने करआकारणी करणेबाबत मान्यता मिळाली आहे. |
| १०. | क्षेत्रफळ दुरूस्ती, सदनिका नंबर दुरूस्तीबाबत | ६/१२७, दिनांक २४/०७/२००१ | टीजीओ/२०३९, दिनांक ०१/०८/२००१ | सदनिकेचे क्षेत्रफळ व नंबर दुरूस्ती करणे, त्या त्या आर्थिक वर्षातील आकारणीच्या वाजवी दरानुसार करयोग्य मूल्य निश्चित करणे, याप्रमाणे मिळकतीची करपात्र रक्कम आकारणी दिनांकापासून दुरूस्त करणेबाबत मा. सह आयुक्त यांना अधिकार प्रदान. सदर दुरूस्तीबाबत प्रस्ताव ठेवणेपूर्वी खालील कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक<br>(१) मंजूर नकाशाची प्रत (प्लॅनची कॉपी)<br>(२) मिळकत तपासणीबाबत पेठ निरीक्षक व विभागीय निरीक्षक यांचा तपासणी अहवाल (सी फॉर्म)<br>(३) नंबर दुरूस्तीबाबत सोसायटीचे लेटरहेडवर चेअरमन, सेक्रेटरीच्या सहीने ना–हरकत प्रमाणपत्र इ. तद्नुषंगिक कागदपत्रे. |
| ११ | मिळकतीच्या आकारणीमधील दुरुस्ती, करपात्र रकमेतील दुरुस्ती, नाव मिळकत क्र. क्षेत्रफळ, वाजवीभाडे इ. आकारणी दिनांकापासून दुरुस्ती करणे. | जा.क्र.टीजीओ/९११,दि. १६/०५/२०१३ | अधिकार सुपुर्ती मआ/डीईएल/१/१४८१ ,दि.१६/०५/२०१३ | विषयांकित बाबत महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ कलम ४८५ अन्वये खातेप्रमुख यांना प्रदान केलनेले अधिकार ज्या मिळकतींचे क्षेत्रफळ २००० चौ.फुटापेक्ष ा अधिक असेल त्याबाबत दुरुस्ती करण्याचे अधिकार अतिरिक्त महापालिका आयुक्त इस्टेट व ज्या मिळकतींचे क्षेत्रफभ २००० चौ.फुटापेक्षा कमी आहे त्याबाबत दुरुस्ती करण्याचे अधिकार करआकारणी व करसंकलन प्रमुख यांना देण्यात आले आहे. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | भाडेकरू निघून गेल्याने भाडयाने दिलेल्या मिळकतीची पूर्वीची करपात्र रक्कम निश्चित करणेबाबत. | मा. महा. आयुक्त यांनी ठराव क्र.६/१९५, दि. २८/१२/२००२ | टीजीओ/२२९७ दि.३०.१०.२००२ | मिळकतीमधील भाडेकरी जागा खाली करून गेल्यास सदनिकाधारकांकडून आर्थिक वर्षात ज्या महिन्यात अर्ज दाखल केला असेल त्या सहामाहीची मिळकतकराची संपूर्ण रक्कम भरून घेण्यात येवून सदनिकाधारक सदनिकेचा वापर स्वतः राहणेसाठी करत असेल, तर पूर्वीची करपात्र रक्कम कायम करण्याचे धोरण मान्य करण्यात आले आहे. या धोरणाची कार्यवाही चालू आहे.<br>तथापि भाडेकरू सदनिका सोडून गेल्यानंतर सदनिकेचा ताबा सदनिकाधारक घेऊन करपात्र रक्कम कमी करावी, अशी मागणी करतात. प्रचलित धोरणानुसार त्या सहामाहीची कराची रक्कम सदनिकाधारकाकडून स्वीकारून पुढील सहामाहीचे एक तारखेपासून करपात्र रकमेत दुरूस्ती केली जाते.<br>तथापी या पद्धतीमुळे न्याय मिळत नाही अशी बऱ्याच सदनिकाधारकांची तक्रार असते. कारण एप्रिल/मे महिन्यामध्ये भाडेकरू जागा सोडून गेल्यानंतर व सदनिकाधारकाने अर्ज केल्यास सदनिकेची करपात्र रक्कम पुढील सहामाहीच्या एक तारखेपासून म्हणजेच दि. १ ऑक्टोबर पासून दुरूस्त करण्यात येते. महानगरपालिका अधिनियमातील शेडयुल चॅप्टर ८ मधील नियम क्र.२० मधील तरतूद स्पष्ट आहे. सदरची तरतूद विचारात घेऊन संदर्भ क्र.२ अन्वये, अशा प्रकारची खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मा. महा. आयुक्त यांनी संदर्भ क्र.२ चे ठरावानुसार मान्यता दिली आहे.<br>दिनांक १ ते १५ या मुदतीत जे सदनिकाधारक भाडेकरू जागा सोडून गेल्याचे कारणास्तव करपात्र रक्कम दुरूस्त करण्याकामी अर्ज करतील, अशावेळी त्या महिन्याच्या एक तारखेपासून व जे सदनिकाधारक दिनांक १६ ते ३०/३१ या मुदतीत अर्ज दाखल करतील, अशावेळी पुढील महिन्याची एक तारीख धरून वार्षिक करपात्र रक्कम दुरूस्त करणेत यावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कार्यालय परिपत्रक | | जा.क्र.सहमआ/७६ दिनांक१२/०५/२००३. | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ अन्वये सामान्य कर कोणत्या जागांवर बसवावयाचा व कोणास माफी दयावयाची याबाबत तरतूद आहे. अशा प्रकरणी सर्वसाधारण करातून माफी मिळणेबाबत अर्ज केल्यास खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहे.<br>१. संस्थेचे ध्येय, प्रयोजन, उद्देश (Aims and objects of the Trust) (Constitution).<br>२. संस्थेची निवेदन पत्रिका (Memorandum of Trust).<br>३. संस्थेचे तीन वर्षांची हिशोबाची कागदपत्रे (Audited accounts for last 3 years).<br>४. मा.धर्मादाय आयुक्त यांनी प्रमाणित केलेले नोंदणीपत्र (Registration Certificates (2) of the Trust registered with the Charity Commissioner)<br>५. आयकर माफीचा दाखला (Income Tax Exemption Certificate issued under Sec.80 (G) of I.T.Act) |
| | डोंगरउतार, डोंगरमाथा मधील मोकळ्या जागेचे कर आकारणीबाबत | ठ.क्र. ६/८८९, दि. २३/०३/२००९ | जा.क्र. मआ/टीजीओ/३५६६, दि. २३/०३/२००९. | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या मोकळ्या जागांवर मिळकत कर आकारणी करण्याच्या धोरणाचा समावेश आहे. त्यानुसार संदर्भांकित कार्यालयीन आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.<br>मात्र डोंगर माथा/डोंगर उतार (HTHS Zone) क्षेत्रातील जागेसाठी प्रचलित बांधकाम नियमावलीप्रमाणे ०.४०% चटई क्षेत्राइतके बांधकाम अनुज्ञेय असतानादेखील अशा क्षेत्रासाठीही मोकळ्या जागेस १ एफएसआय असल्याप्रमाणेच कर आकारणी करण्याचे प्रचलित धोरण आहे. यामुळे डोंगरमाथा/डोंगर उतार या क्षेत्रामध्ये समावेश असलेल्या क्षेत्रापैकी सुमारे ९६% क्षेत्र हे वनीकरणासाठी राखीव ठेवणे अपेक्षित असल्यामुळे सदर मिळकत धारकांवर/जमिन धारकांवर कर आकारणीचा मोठा बोजा पडत आहे.<br>यास्वत डोंगर माथा/डोंगर उतार या क्षेत्रामध्ये समावष्टि असलेल्या मोकळ्या जमिनीसाठी खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.<br>१. संबंधित जागा मालकाने सदर जागेस स्वखर्चाने कुंपण (Fencing) करण्याची परवानगी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महानगरपालिकेकडे मागितली पाहिजे व तशा पद्धतीने Fencing करून अशा मोकळ्या जागेत एक एकरामध्ये किमान १०० झाडे लावणे आवश्यक आहे.<br>२. सदरच्या झाडांचे किमान ५ वर्षे संवर्धन, संरक्षण व देखभाल (Protected & Maintained) संबंधित जागा मालकाने करणे अत्यावश्यक आहे.<br>३. वरील अटींची पूर्तता जे मिळकतधारक करतील त्यांना त्यांच्या मोकळ्या जागेपैकी अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राइतकी ४% + संलग्न ४% (Buildable Potential 4% + Land Apurtement 4%)<br>४. म्हणजेच एकूण ८% इतक्या क्षेत्रावर मोकळ्या जागेची कर आकारणी करण्यात यावी. उर्वरित ९२% क्षेत्रास मोकळ्या जागेच्या कर आकारणीतून वगळण्यात यावे.<br>५. वर नमूद केल्याप्रमाणे क्र. १ व २ बाबत बांधकाम नियंत्रण विभाग व उद्यान विभाग यांचेकडून अभिप्राय घेण्यात यावा व त्यानुसार सदर अटींची पूर्तता केलेली नसल्यास अशा मोकळ्या जागांसाठी मात्र संदर्भांकित आदेशाप्रमाणे संपूर्ण मोकळ्या जागेवर कर आकारणी करण्यात यावी.<br><br>**महापालिका आयुक्त,**<br>**पुणे महानगरपालिका.** |

मुदतीत मिळकत कर भरून सहकार्य करावे.
मिळकत कर भरा, विकास कामांना हातभार लावा.